www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक
# युवक आधार
मराठी




संपादक - संतोष शिवदास आमले

मुख्य संपादक - भारती आमले  उपसंपादक - श्री विलास गायकवाड  कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे  निवासी संपादक- श्री राकेश पाटील  सह संपादक - श्री मुकुंद कांबळे  महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : ३  अंक : ६४  बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५  किंमत : ४ रु  पृष्ठ : ८  RNI MAHMAR/2023/89514

## वैद्यकीय शिक्षणासाठी सानिया भोईरला श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून आर्थिक मदत

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते धनादेश सुपूर्द

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

खांदा कॉलनी येथील सुभाष भोईर यांची कन्या सानिया भोईर हिला वैद्यकीय उच्च शिक्षणासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. हा धनादेश मंडळाचे संस्थापक, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. ११) सुपूर्द करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीस वर्षांहून अधिक काळापासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतः च्या पायावर उभे केले जाते. सानिया भोईर हि एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण एमजीएम



महाविद्यालयात घेत असून तिला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. आर्थिक अडचणीत असलेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मदत करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी संधी उपलब्ध करून देणे, हा मंडळाचा नेहमीचा उद्देश राहिला आहे, त्यानुसार हि मदत करण्यात आली. सदरचा धनादेश सानियाची आई प्रतिभा भोईर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर बधे, नामदेव घरत, मंडळाचे कार्यालयीन सचिव अनिल कोळी उपस्थित होते.

## ३८ वर्षांनंतर कृषी विभागाला मिळाले नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य

### नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण

**दैनिक युवक आधार**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे राज्य कृषी विभागाच्या नवीन बोधचिन्हाचे तसेच 'शाश्वत शेती - समृद्ध शेतकरी' या नवीन घोषवाक्याचे अनावरण केले.

आज सह्याद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मुख्य उपस्थितीत कृषी विभागाच्या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याचं अनावरण करण्यात आलं. तसेच बोधचिन्ह स्पर्धेतील विजेता आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी, मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मंत्री माणिकराव कोकाटे, मंत्री हसन मुश्रीफ, मंत्री गिरीश महाजन, कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, मुख्य सचिव राजेश कुमार, कृषि आयुक्त सुरज मांढरे, उपसचिव प्रफुल्ल ठाकूर, संचालक रफिक नाईकवाडी, कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.




"महाराष्ट्राची शेती ही परंपरेशी जोडलेली असूनही सतत नव्या दिशेने वाटचाल करणारी आहे. कृषी विभागाचे हे नवे बोधचिन्ह म्हणजे केवळ प्रतीक नाही, तर महाराष्ट्राच्या शेतीचा आधुनिक चेहरा आहे. या लोगोमधून शेतकऱ्यांची शक्ती, तंत्रज्ञान, आणि पर्यावरणपूरक विकासाचा संदेश दिला आहे. हे बोधचिन्ह आणि घोषवाक्य राज्यातील प्रत्येक शेतकऱ्यांच्या प्रगतीचे प्रतीक बनेल. हा बदल म्हणजे 'नव्या युगातील नव्या कृषी विचारांचा आरंभ' आहे." अशी प्रतिक्रिया कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिलेल्या माहीतीनुसार, "कृषी विभागाचे विद्यमान बोधचिन्ह सुमारे ३८ वर्षांपूर्वी तयार करण्यात आले होते. या कालावधीत शेतीत तंत्रज्ञान, यांत्रिकीकरण, नैसर्गिक शेती, हवामानबदल आणि उत्पादनाच्या नव्या दिशा अशा अनेक मूलभूत परिवर्तनांच्या पार्श्वभूमीवर विभागाची दृश्य आणि संवादात्मक ओळख अद्ययावत करण्याची गरज निर्माण झाली होती. या उद्देशाने कृषी विभागाने खुली स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त व्हावे यासाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक आवाहन (Call for Proposal) समावेशित करण्यात आले. कला महाविद्यालयातील आणि कृषी विद्यापीठातील विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, अभ्यासक, कलाकार, डिझायनर्स, लेखक, अधिकारी, कर्मचारी आणि अन्य इच्छुक व्यक्तींना प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले होते. या स्पर्धेला अत्यंत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला ज्यात एकूण ७६१ बोधचिन्ह प्रस्ताव आणि ९४९ घोषवाक्य प्रस्ताव प्राप्त झाले." भरणे पुढे म्हणाले, "प्राप्त प्रस्तावांचे परीक्षण करण्यासाठी कृषी आयुक्तांच्या मान्यतेने समिती गठित करण्यात आली. या समितीने प्रत्येक प्रस्तावाचा तपशीलवार अभ्यास करून उत्कृष्ट कल्पनांची निवड केली. अंतिम निवड समितीने शासनास प्रत्येकी तीन बोधचिन्ह आणि तीन घोषवाक्यांची शिफारस केली, ज्यांपैकी एकाची अंतिम निवड शासनाने केली. ७ नोव्हेंबर २०२५ ला या नव्या बोधचिन्ह आणि घोषवाक्याला कृषी विभागाकडून मान्यता देण्यात आली आणि आज याचं अनावरण करण्यात आलं. बोधचिन्ह स्पर्धेतील विजेते श्री. विरेंद्र भाईदास पाटील (क्रेझी क्रिएशन्स, भुसावळ) आणि घोषवाक्य स्पर्धेतील विजेत्या श्रीमती सिद्धी भारतराव देसाई (परभणी) असून त्यांचं कृषी विभागातर्फे अभिनंदन करतो."

**भविष्यातील वापर आणि अधिकार**

या नव्या उपक्रमामुळे कृषी विभागाची दृश्य ओळख अधिक सशक्त होणार असून, यापुढे कृषी विभागाच्या सर्व अधिकृत उपक्रमांमध्ये हे नवे बोधचिन्ह आणि घोषवाक्य वापरले जाणार आहे.

हे चिन्ह आणि घोषवाक्य हे कृषी विभागाची मालमत्ता असून, त्याचा अनधिकृत वापर केल्यास संबंधितांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

## पनवेल परिसरात दोन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुक्यात एका दिवसात घडलेल्या दोन वेगवेगळ्या अपघातांत दोघांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. अनिता मंगेश सरफरे (४२, रा. वरळी कोळीवाडा) या आपल्या पतीसह दुचाने अलिबाग येथील आजारी वडिलांना भेटण्यासाठी सायन-पनवेल मार्गाने जात असताना त्यांच्या दुचाकीला कळंबोली येथील पुरुषार्थ पेट्रोल पंपाजवळ भरधाव डम्परने त्यांच्या जोरदार धडक दिली. यात अनिता सरफरे गंभीर जखमी झाल्या. त्यांना रुग्णालयात दाखल केले असता उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर कळंबोली पोलिसांनी डंपर चालक छोटन यादव याला अटक केली आहे. तर दुसऱ्या घटनेत तळोजा येथील नावडे गावासमोरील रस्त्यावर मिलिंद भिकाजी सुरडकर (५५) हे रस्ता ओलांडत असताना त्यांना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. घडकेनंतर वाहन त्यांच्या अंगावरून गेल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेनंतर वाहनचालक पसार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

## भाड्याच्या घरात कितीही राहिलात तरी मालक होऊ शकत नाही - सर्वोच्च न्यायालयाचा महत्वाचा निकाल

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेला अलीकडील निर्णय केवळ एका भाडेकरू-घरमालक वादापुरता मर्यादित नाही,तो भारतीय नागरी वसाहत, भाडे व्यवस्थापन व मालमत्ता हक्कांच्या कायदेशीर चौकटीबाबत महत्त्वपूर्ण दिशा दाखवणारा ठरला आहे. न्यायालयाने स्पष्ट केले की, कोणताही भाडेकरू, तो कितीही वर्षे त्या घरात राहात असला तरी, त्या मालमत्तेचा मालक म्हणून दावा करू शकत नाही.हा निर्णय ज्योती शर्मा विरुद्ध विष्णू गोयल या खटल्यात देण्यात आला. दिल्ली उच्च न्यायालयाने पूर्वी गोयल यांच्या बाजूने दिलेला निकाल उलटवत सर्वोच्च न्यायालयाने शर्मा यांच्या बाजूने निर्णय सुनावला. खंडपीठाने आपल्या निरीक्षणात म्हटले की भाडेतत्व हे मालकाच्या परवानगीवर आधारित परस्परसंमत नातं आहे. त्यामुळे अशा नात्याला 'ad-




verse possession' म्हणजेच प्रतिकूल ताब्याचा तत्त्व लागू होत नाही.कायदेशीर संदर्भ आणि अर्थ१९६३ च्या लिमिटेशन कायद्यानुसार, जर एखाद्या व्यक्तीने कोणत्याही मालमत्तेवर १२ वर्षे सातत्याने आणि मालकाच्या हिताविरुद्ध ताबा ठेवला तर त्याला मालकी हक्काचा दावा करता येतो. पण सर्वोच्च न्यायालयाने भाडेकरूच्या जागेसंबंधी स्पष्ट केलं की त्यांच्या ताब्यात कोणतीही शत्रुत्वाची भावना किंवा मालकाच्या अधिकाराला विरोध नसतो. त्यामुळे ते मालकी हक्क मिळवू शकत नाहीत.न्यायालयाने बलवंत सिंह विरुद्ध पंजाब सरकार (१९८६) आणि रविंद्र कुमार ग्रेवाल विरुद्ध मनजीत कौर (२०१९) या दोन्ही खटल्यांचा संदर्भ देऊन पुन्हा एकदा अधोरेखित केले की, प्रतिकूल ताबा हा केवळ त्या वेळी लागू होतो जेव्हा ताबा मालकाच्या हिताच्या विरोधातील 'जाणीवपूर्वक शत्रुत्वा'वर आधारित असेल.निर्णयाचे परिणाम आणि प्रभावहा निकाल देशातील लाखो घरमालकांसाठी मोठा दिलासा मानला जातो. अनेक भाडेकरू दीर्घकाळ एखाद्या घरात राहिल्याने आपली मालकी सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या भ्रमाला पूर्णविराम देतो. नागरिकहक्क आणि मालमत्ता संरक्षणाच्या दृष्टीने हा निर्णय न्यायसंगत संतुलन राखणारा आहे.मात्र या निर्णयाचे सामाजिक परिणाम मिश्र आहेत. एकीकडे घरमालकांना कायद्याचं ठोस संरक्षण मिळत असताना, अनेक गरीब आणि दीर्घकाळ भाड्याच्या घरात राहणाऱ्यांसाठी हा निकाल असुरक्षिततेची भावना निर्माण करू शकतो. शहरांमध्ये स्थायिकत्वाच्या आस असलेल्या कुटुंबांना भाडेकरू आणि मालक यांच्यातील सत्तासंबंधांच्या वास्तवाशी सतत झुंज द्यावी लागते. तज्ज्ञांची प्रतिक्रियावरिष्ठ वकील राजीव धवन यांनी या निर्णयाचं स्वागत करत म्हटलं की, "हा निर्णय केवळ एका प्रकरणापुरता मर्यादित नाही, तर तो कराराच्या पवित्रतेचं आणि परस्परसंमतीच्या तत्वाचं रक्षण करणारा आहे." अनेक कायदे तज्ज्ञांच्या मते, हा निर्णय भविष्यात मालकीचे खोटे दावे थांबवण्यास मदत करेल आणि भाडे व्यवहार अधिक स्पष्टपणे कायदेशीर चौकटीत ठेवेल.निष्कर्षसर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय भारतीय नागरी व्यवहारांच्या न्यायिक इतिहासातील एक टर्निंग पॉइंट ठरू शकतो. यातून केवळ प्रॉपर्टी हक्कांचं नव्हे तर न्यायसंस्थेच्या दृष्टीने 'कायदेशीर नातं आणि वास्तविक ताबा' यातील सीमारेषा अधिक स्पष्ट झाली आहे.

## फायर एक्झिटशिवाय उंच इमारत म्हणजे मृत्यूचा सापळा!; उरण-नवी मुंबई विभागात सरकारचा इशारा

### सर्व इमारतींसाठी फायर एक्झिट बंधनकारक

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी :** आगीच्या दुर्घटनांमध्ये जीव गमावण्यामागचं सर्वात मोठं कारण म्हणजे बचाव मार्गाचा अभाव. अनेक इमारतींमध्ये लोक गुदमरून मृत्यूमुखी पडतात, तर बिल्डर आणि प्रशासन काहीही धडे घेत नाहीत. राज्य सरकारने आता स्पष्ट इशारा दिला आहे. फायर एक्झिट नसलेली इमारतीची परवानगी रद्द! अग्निशमन दलाने सुधारित अग्निसुरक्षा नियमावली जाहीर केली असून, सर्व निवासी, व्यावसायिक आणि औद्योगिक इमारतींना फायर एक्झिट आणि फायर सेफ्टी सिस्टिम बंधनकारक करण्यात आली आहे. परवानग्या आता पूर्णपणे ऑनलाइन उपलब्ध होणार आहेत, अर्जदारांनी ऑटोडीसीआर पोर्टलवर अर्ज



भरावा आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील .

अर्जदारांनी इमारतीचा आराखडा, अग्निसुरक्षा उपकरणे, आपत्कालीन निर्गमन मार्ग, फायर रेसिस्टंट साहित्य याची माहिती अपलोड करावी. अधिकारी 15 दिवसांत प्राथमिक तपासणी करतील, अंतिम निर्णयासाठी 30 दिवसांची मर्यादा निश्चित. निवासी इमारती : 15 मीटरपेक्षा उंच : फायर अलार्म, पंप, पाणी टाकी, आपत्कालीन जिना, 24 मीटरपेक्षा उंच : स्प्रिंकलर, स्मोक डिटेक्टर, फायर लिफ्ट, हायड्रंट नेटवर्क, वार्षिक फायर सेफ्टी कंप्लायन्स सर्टिफिकेट अनिवार्य. व्यावसायिक इमारती : मॉल, मल्टिप्लेक्स, ऑफिस कॉम्प्लेक्स; प्रत्येक मजल्यावर फायर उपकरणे, स्मोक अलार्म, फायर एक्झिट, फायर एनओसीचे वार्षिक नूतनीकरण बंधनकारक. औद्योगिक व संस्थात्मक इमारती : रुग्णालये, शाळा, प्रयोगशाळा, ऑक्सिजन व ज्वलनशील वस्तूंच्या साठवणुकीसाठी स्वतंत्र सुरक्षा योजना बंधनकारक. उरण, जुईनगर, खारघर, कामोठे, पनवेल, बेलापूर परिसरातील उंच इमारतींवर अग्निशमन विभागानं विशेष तपासणी मोहीम सुरू केली आहे. फायर एक्झिट नसलेल्या किंवा एनओसी नूतनीकरण न केलेल्या इमारतींवर थेट दंड, सील किंवा परवानगी रद्दीकरण कारवाई होणार आहे.

## सांस्कृतिक, वांङ:मयीन लाखनीनगरीत ग्रामीण युवा साहित्य संमेलनाचे भव्य आयोजन; साहित्य संमेलनासाठी लाखनीनगरी सज्ज

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा -** लाखनी येथे मराठी भाषा विभाग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई यांच्या अनुदानातून मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्था दिघोरी/नान्होरी जि. भंडारा द्वारा आयोजित दोन दिवसीय जिल्हास्तरीय ग्रामीण युवा साहित्य संमेलन लाखनी येथील उत्सव सेलिब्रेशन हॉल अँड लान, राष्ट्रीय महामार्ग, भंडारा रोड,लाखनी येथे दि. 15 आणि 16 नोव्हेंबर 2025 रोज शनिवार आणि रविवारला संपन्न होणार आहे.प्रसिद्ध रंगकर्मी आणि समीक्षक डॉ. संजयकुमार निंबेकर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या साहित्य संमेलनाचे




उदघाटन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी हे करणार आहेत.उदघाटन आणि समारोपीय सत्रात तथा परिसंवाद, कविसंमेलन आदी कार्यक्रमात महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक उपस्थित राहणार आहेत.दोन परिसंवाद, एक चर्चासत्र, कविसंमेलन, सहा लेखकांच्या पुस्तकांचे प्रकाशन, शाहीर अरुण बन्सोड यांची खडीगंमत, डॉ. हरिश्चंद्र बोरकर यांची प्रकट मुलाखत, पालिकचंद बिसेन आणि अनिल शेंडे यांची बासरीवादनाची जुगलबंदी, झाडीपट्टीतील युवा कलावंतांचा पंचरंगी लोककलाविष्कार - 'झाडीपट्टीचा धुमधडाका ', महेंद्र गोंडाने यांचा एकपात्री नाट्यप्रयोग - ' सहावी बाळंतीण ' अशा भरगच्च कार्यक्रमाची मेजवानी रसिक प्रेक्षकांना मिळणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या साहित्य संमेलनाला उपस्थित राहण्याचे आवाहन संमेलनाचे मुख्य संयोजक आणि मुक्ताई बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव डॉ. सुरेश खोब्रागडे, स्वागताध्यक्ष संजय वनवे, निमंत्रक प्रा. डॉ. युवराज खोब्रागडे, स्वागत समिती अध्यक्ष रामेश्वर बिसेन,आयोजन समिती सचिव डॉ. रेवाराम खोब्रागडे, तथा सुरेंद्र बन्सोड, गजेंद्र गजभिये, भास्कर पिंपळे, नामदेव कानेकर, प्रा. उमेश सिंगनजुडे, आशाताई वनवे, वैशाली निंबेकर, सुमनताई कानेकर,कमलताई गणवीर,राजेश खराबे, साधना शिंगाडे, डॉ. मुक्ता आगाशे,आकाश भैसारे, लवकुश निर्वाण,जयेंद्र मेश्राम, विक्की इलमकर, प्रमोद लांडगे, देवराम शेंडे, राजू वासनिक, भावेश कोटांगले, अश्विनी भिवगडे, बाबुराव निखाडे,गोपाल नाकाडे, रंजित वासनिक, शिरीष निर्वाण, नलिनी ढवळे, वीणा डोंगरे,मंगलमूर्ती किरणापुरे, दिनेश पंचबुद्धे,विष्णू चाचेरे,दीपक जनबंधू,प्रा. अशोक गायधनी, नेहाल कांबळे आदी कार्यकर्त्यांनी केली आहे.

## रायगड जिल्ह्यातून पल्लवी पाटील आणि जीवन कोंडिलकर यांची आशिया बुक ऑफ रेकॉर्डमध्ये नोंद!

### आ. विक्रांत दादा पाटील यांनी दिल्या शुभेच्छा !

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** नॅचरल वेलनेस हब, पनवेल चे संस्थापक जीवन कोंडिलकर आणि निसर्गोपचार तज्ञ डाएटिशियन पल्लवी पाटील यांनी डॉ. श्वेता राय यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या "Maximum Number of Intrahepatic stones removed naturally" या ऐतिहासिक उपक्रमात मोलाची भूमिका बजावली आहे.

डॉ. डीटी. श्वेता राय, एलिमेंट्स सोल इन्स्टिट्यूट एलएलपी, महाराष्ट्र, भारत यांच्या मार्गदर्शनाखाली, लिव्हर डिटॉक्स कार्यक्रमातील सर्वाधिक सहभागींचा विक्रम नोंदवला आहे. श्री. संजय सोनी, डीटी. प्राजक्ता मुठे आणि श्री. देवराज खत्रा यांनी या कार्यक्रमाचे सह-आयोजन केले होते. २३ ऑगस्ट, २०२५ (अमावस्या) रोजी, डॉ. राय यांनी झूमद्वारे जोडलेल्या ५० हून



अधिक सहभागींसह लिव्हर डिटॉक्सचे नेतृत्व केले. नैसर्गिक आहार आणि डिटॉक्स प्रक्रियेद्वारे शरीरातील विषारी घटक आणि इन्ट्राहेपॅटिक स्टोन्स (पित्ताशयाचे खडे) नैसर्गिकरित्या घरगुती पद्धतीने बाहेर टाकण्यात उल्लेखनीय यश मिळवले.या अभिनव उपक्रमाची Asia Book of Records कडून अधिकृत नोंद २७ सप्टेंबर २०२५ रोजी गोवा येथे सन्मानपूर्वक करण्यात आली.

हा सन्मान गोव्याचे माजी वनमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे वरिष्ठ नेते श्री. विनय दिनू तेंडुलकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. मागील वर्षी डाएटिशियन पल्लवी पाटील यांनी इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड आणि इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये आपले नाव नोंदविल्यानंतर या वर्षी आशिया बुक ऑफ रेकॉर्ड स्थान मिळवले.

**संदेश**

मानवी शरीर हे निसर्गाने बनलेले आहे. तर आपल्याला आजारातून बाहेर सुद्धा निसर्ग करू शकतो. फक्त योग्य ज्ञान आणि मार्गदर्शनाचा अभाव असल्यामुळे आपण कृत्रिम गोष्टींकडे सहज आकर्षित होतो. अधिक आणि सविस्तर माहितीसाठी एकदा natural wellness hub ला नक्की भेट द्या.

# इंदापूर येथील पत्रकार मा. चंद्रकांत मांढरे यांना समाजगौरव पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील कालठण येथील जेष्ठ पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते मा चंद्रकांत मांढरे यांना गोवा (शिरोदा) ९/११/२५ रोजी येथील शिक्षण विकास परिषदेचा २९ वा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.




इंदापूर ( कालठण नं१) येथील यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण संस्था पुणे च्या इंदापूर तालुका अध्यक्ष (पत्रकार ) मा. चंद्रकांत मांढरे यांना उत्कृष्ट कार्याबद्दल समाज गौरव हा पुरस्कार मा.डॉ. डब्ल्यू.एन.साळवे (पुणे), मा. श्री. दिनेश पवार (उपसंचालक कला आणि संस्कृती, एम डी. गोवा) आणि मा. श्री. सुरज वैर्णेकर (उप. रजिस्टर कंपनी ऑफ सोसायटी, मडगाव-गोवा) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.यावेळी यशोदा माहिती अधिकार प्रशिक्षण चे संस्थापक अध्यक्ष श्री खंडू अण्णा गव्हाणे श्री राहुल जाधव तसेच सौ.अनघलक्ष्मी दुर्गा उपस्थित होते.

# राजू तीळेवाड कोर्टा पंचायत समिती गणातून इच्छुक उमेदवार

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड** : बंदी भागात गेल्या अनेक वर्षांपासून सतत आदिवासी समाजासाठी काम करणारे राजू तिळेवाड हे पंचायत समिती कोर्टा गणातून इच्छुक उमेदवार आहेत त्यांनी बंदी भागातील आदिवासी गावात काही लोकांना संस्थेच्या माध्यमातून विविध साहित्य वाटप केले आहेत त्यांनी विद्यार्थ्यांसाठी



शैक्षणिक साहित्य वाटप केले आहे त्यांनी आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी बंदी भागात मोठे आंदोलन उभारले आहेत आणि त्याचे काम हे अतिशय चांगले आहे ते आदिवासी समाजातील नाईकडा समाजातून येतात त्यांना या वेळी लोकप्रतिनिधी म्हणून समाजाची सेवा करण्याची प्रबळ इच्छा आहे बिरसा ब्रिगेड संघटनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक शाखा उभारल्या आहेत लोकांना संघटित केले आहे कोर्टा गणात शुशिक्षित युवा उमेदवार असला पाहिजे असे कोर्टा गणातील जाणकार लोकांचे म्हणणे आहे.

# योनेक्स सनराईज महाराष्ट्र सीनियर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धेला उत्साही सुरुवात

## राज्यातील ३०० पेक्षा अधिक खेळाडूंचा सहभाग; विजेत्यांना एकूण ५.५ लाखांचे रोख बक्षीस

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : 'बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगड यांच्या वतीने व रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या सहकार्याने आणि महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनच्या मान्यतेने आयोजित योनिक्स सनराईज द्वितीय महाराष्ट्र सीनियर स्टेट सिलेक्शन रामशेठ ठाकूर ट्रॉफी बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आज (दि. ११ )मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष व कामगारनेते महेंद्र घरत, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे जनरल सेक्रेटरी वाय. टी. देशमुख, महाराष्ट्र बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी आशिष बाजपेयी, कोर्ट ऑफिशियल कमिटीचे चेअरमन विश्वास देसवंडीकर, योनेक्स सनराईजचे बालकृष्णन चौधरी, स्पर्धेचे संयोजक व बॅडमिंटन ऑर्गनायझेशन ऑफ रायगडचे अध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, अनिरुद्ध पाटील, उपाध्यक्ष रविंद्र भगत, शिवकुमार करयिल, सेक्रेटरी डेव्हिड अल्वारिस, खजिनदार नरेंद्र जोशी, रेफरी विनय जोशी, नाशिक बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी पराग एकांदे, अहमदनगर बॅडमिंटन असोसिएशनचे सेक्रेटरी मिलिंद कुलकर्णी, श्रीशैल मिटकरी, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, न्हावे ग्रामपंचायत सरपंच विजेंद्र म्हात्रे, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, विजय घरत, अनंता ठाकूर, निलेश खारकर, सी.एल. ठाकूर, अमर म्हात्रे, अंकुश ठाकूर, योगिता भगत, प्रतीक गोंधळी, श्यामनाथ पुंडे, योगेश पाटील यांच्यासह खेळाडू व बॅडमिंटन रसिक उपस्थित होते.




लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले स्पर्धेचे उदघाटन

उद्घाटनप्रसंगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खेळाडूंना शुभेच्छा देत सांगितले की, “क्रीडा ही शिस्त, आत्मविश्वास आणि राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक आहे. खेळाडूंनी या स्पर्धेचा उपयोग आपल्या खेळगुणांचे प्रदर्शन करण्यासाठी आणि राज्याचे नाव उज्ज्वल करण्यासाठी करावा, असे आवाहन करून सर्व खेळाडूंना स्पर्धेसाठी आणि पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेच्या आयोजनासाठी बॅडमिंटन संघटनेचे पदाधिकारी, प्रशिक्षक व स्वयंसेवकांनी उत्कृष्ट नियोजन केले आहे. ही स्पर्धा आजपासून १५ नोव्हेंबर या कालावधीत म्हणजेच पाच दिवस चालणार असून, राज्यातील विविध जिल्ह्यांमधील सुमारे ३०० सर्वोत्तम खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. पुरुष एकेरी,




महिला एकेरी, पुरुष दुहेरी, महिला दुहेरी आणि मिश्र दुहेरी अशा गटांमध्ये सामने खेळवले जात आहेत. या स्पर्धेतील विजेते, उपविजेते आणि उपांत्य फेरीतील खेळाडूंना एकूण ४ लाख रुपयांची रोख पारितोषिके, चषक आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच, रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने अंतिम फेरीतील खेळाडूंसाठी अतिरिक्त दीड लाख रुपयांचे विशेष रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. स्पर्धेचा अंतिम सामना आणि समारोप समारंभ १५ नोव्हेंबर रोजी आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. या समारंभात विजेत्या खेळाडूंना बक्षिसे प्रदान करण्यात येतील. स्पर्धेला सुरुवातीपासूनच खेळाडू, पालक आणि प्रेक्षकांचा मोठा उत्साह लाभत असून, उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये उत्कृष्ट सुविधा व दर्जेदार व्यवस्थेमुळे खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचा अनुभव मिळत आहे.

# पार्वतीबाई भगवानराव ताठे यांचे झाले निधन

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

परतुर तालुक्यातील दैठणा खुर्द येथील पार्वतीबाई भगवानराव ताठे वय 65 वर्षे यांचे अल्पशा आजाराने सोमवार दि 10 नोव्हेंबर 2025 रोजी दुपारी तीन वाजता दुःखद निधन झाले.

त्यांच्या पाश्चात सासू, तीन मुले, दोन भाऊ, एक बहिण, सुना नातवंड असा परिवार आहे.



त्या एम.डी. सवणे यांच्या बहीण होत्या.

# गज आनन म्हात्रेंच्या हवेलीचं साहित्यरत्न प्रा.एल.बींच्या हस्ते प्रकाशन !!

**दैनिक युवक आधार**
**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

भूमिपुत्र सामाजिक प्रतिष्ठान आणि नवरंग साहित्य संस्कृती आणि कला मंडळ, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने काल रविवार दिनांक ९ नोव्हेंबर २०२५ रोजी निसर्गरम्य पुष्पपर्णी नर्सरी, सेक्टर- २७,

सीवूड्स-नेरुळ, नवीमुंबई येथे एक पुस्तक प्रकाशन सोहळा आणि नवरंग म्युझिकल सर्कलचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. या सोहळ्यामध्ये प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रा. प्रतिभा सराफ, ज्येष्ठ साहितिक आणि अध्यक्ष म्हणून प्रा. एल बी पाटील, ज्येष्ठ साहित्तिक उपस्थित होते. या सोहळ्याची सुरुवात व्यासपीठावर उपस्थित असणाऱ्या सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून करण्यात आली. त्यानंतर श्री. विलास राजुरकर यांनी स्वागत गीत गायल्याने सोहळ्याची




मंगलमय सुरुवात झाली.

व्यासपीठावर प्रा. प्रतिभा सराफ, प्रा. एल बी पाटील, श्री गज आनन म्हात्रे, डॉ. प्रा. अजित मगदुम (ज्येष्ठ साहित्तिक), श्री. विकास साठे (अध्यक्ष ज्येष्ठ नागरिक, नेरूळ), गायक श्री. संतोष थळे, श्री. घनश्याम परकाळे (कार्यवाहक), लेखक गज आनन म्हात्रे (अध्यक्ष) हे मान्यवर उपस्थित होते.

व्यासपीठावरील मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या सोहळ्याच्यावेळी रंगधनु प्रकाशित आणि लेखक श्री. गज आनन म्हात्रे लिखित "हवेली की अनकही दास्तान" या हिंदी कादंबरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच गायक श्री. संतोष थळे यांनी गायलेल्या गणेश गीताने नवरंग म्युझिक सर्कलचे उद्घाटन संपन्न झाले.सर्व मान्यवरांनी त्यांचे मौलिक विचार मांडून अमूल्य मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. घनश्याम परकाळे यांनी छान केले. सोहळ्यास गुणग्राहक श्रोत्यांचा चांगला प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाची सांगता शेवटी राष्ट्रगीत गाऊन करण्यात आली.

**सुभाष कोडोलकर**
**नवरंग कार्यकारीणी सदस्य !!**

# वार्ड क्र.,३ / ४ मध्ये कर्तव्यदक्ष नगरसेवक बंटी भाऊ काळे यांची पाण्याची पूर्तता सेवा

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

सोयगाव शहरातील वार्ड क्रमांक ३ / ४ मध्ये गेल्या काही दिवसांपासून नळाला पाणीपुरवठा खंडित झाल्यामुळे नागरिकांना पाण्याच्या तीव्र टंचाईचा सामना करावा लागत होता.ही बाब लक्षात घेत कर्तव्यदक्ष नगरसेवक बंटी भाऊ काळे यांनी तत्काळ पुढाकार घेत नागरिकांच्या पाण्याच्या गरजा भागविण्यासाठी स्वतःच्या देखरेखीखाली पाण्याची पूर्तता



केली.सकाळ पासूनच नगरसेवक बंटी भाऊ काळे यांनी पाण्याचे टँकर बोलावून वार्डातील प्रत्येक गल्लीबोळात जाऊन नागरिकांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले. नागरिकांनी त्यांच्या या तत्पर सेवाभावी वृत्तीचे कौतुक केले असून "नगरसेवक बंटी काळे हे नेहमीच नागरिकांच्या सेवेसाठी तत्पर असतात" अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या.या उपक्रमामुळे वार्डातील पाणीटंचाईचा प्रश्न काहीअंशी सुटला असून, नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांनी काळे यांचे आभार मानले आहेत.

**प्रतिक्रिया :**

रफिक शेख,रहिवासी वार्ड क्र.३/ ४ — “गेल्या दोन दिवसांपासून पाण्याचा तुटवडा होता, पण बंटी भाऊ काळे यांनी स्वतः येऊन पाण्याची सोय करून दिली.अशा सेवाभावी नगरसेवकांमुळेच आम्हाला आधार वाटतो.”

फिरोज पठाण नागरिक — “ वेळ न घालवता लगेच टँकरची सोय केली.प्रत्येक गल्लीपर्यंत पाणी पोहोचवले. त्यांचे मनःपूर्वक आभार.”

शकुंतला मापारी गृहिणी — “पाण्याची समस्या गंभीर झाली होती, पण नगरसेवकांनी आमची व्यथा समजून घेतली. त्यांचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे.”

प्रदिप चौधरी,रहिवासी — “बंटी भाऊ काळे हे नेहमीच लोकांसाठी धावून येतात. समस्या काहीही असो — पाणी असो वा इतर,त्यांची तत्परता पाहून अभिमान वाटतो.”

# पाण्याच्या टाकीची तोडफोड करत सामानाची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

पाण्याच्या टाकीची तोडफोड करून तेथील वस्तूंची चोरी केल्याप्रकरणी प्रणव गडकरी (रा. चिखले) याच्या विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

चिखले येथील पाण्याच्या टाकीची तोडफोड करून प्रणव याने येथील पाण्याची मोटार, पाईप आणि इतर वस्तू अशा प्रकारे ५० हजारांपेक्षा जास्त किमतीचा ऐवज चोरुन नेला होता, या घटनेची माहिती सरपंच, ग्रामसेवक यांना मिळाल्यानंतर त्यांनी त्वरीत हे साहित्य प्रणव याने ज्या भंगारवाल्याला विकले होते त्याच्या कडून हे साहित्य त्यांनी ताब्यात घेतले. त्यानंतर पोलिसांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात प्रणव गडकरी याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

# डिझेलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील पळस्पे फाटा येथे पार्क केलेल्या ट्रकमधून अज्ञात चोरटयाने २६० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे.

ट्रकचालक राम राऊत हा त्याच्या ताब्यातील ट्रक (एमएच ०१ ईई ३६८३) हा पळस्पे फाटा येथे पार्क करून झोपला असतांना कोणीतरी अज्ञात चोरटयाने ट्रकमधून सुमारे २३ हजार रुपये किमतीचा २६० लिटर डिझेल चोरून नेला.

याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नांदेड महानगरपालिकेवर भाजपची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी कार्यकर्त्यांनी सज्ज व्हावे अशे राज्या राज्यसभा खासदार अजित गोपछेडे यांचे बैठकीमध्ये मतं



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** - महानगरपालिकेवर भाजपची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आता सज्ज राहिलं पाहिजे अशा निर्धाराने आज माझ्या अंत्योदय’ जनसंपर्क कार्यालयात माजी नगरसेवक आणि भाजपा पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. आगामी महानगरपालिका निवडणुकीच्या पूर्वतयारीचा भाग म्हणून झालेल्या या बैठकीत विविध संघटनात्मक आणि रचनात्मक मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली

बैठकीस खासदार अशोकराव चव्हाण, मराठवाडा संघटन मंत्री संजयजी कौडगे, महानगराध्यक्ष अमरनाथ राजूरकर, उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर देशमुख तसेच दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. संतकुरराव हंबर्डे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत नांदेड शहरात भाजपा बळकट करण्यासाठी, कार्यकर्त्यांचे संघटन अधिक प्रभावी करण्यासाठी आणि नागरिकांपर्यंत भाजपच्या विकासाभिमुख धोरणांची पोहोच वाढविण्यासाठी ठोस मार्गदर्शन करण्यात आले

# ‘खेलो इंडिया’ अंतर्गत रायगड जिल्हा अस्मिता ॲथलेटिक्स लीग कळंबोली येथे १७ नोव्हेंबरला अर्जुन पुरस्कार विजेत्या ललिता बाबर यांच्या उपस्थितीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)** : केंद्र शासनाच्या ‘खेलो इंडिया’ या उपक्रमाअंतर्गत भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि भारतीय ॲथलेटिक्स फेडरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ‘अस्मिता ॲथलेटिक्स लीग स्पर्धा’ आयोजित करण्यात आली आहे. या लीगचे उद्दिष्ट महिलांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढवणे, ॲथलेटिक्सला प्रोत्साहन देणे आणि जिल्हास्तरावर तळागाळातील क्रीडा नैपुण्य विकसित करणे हे आहे.

या उपक्रमासाठी संपूर्ण देशातील ३०० जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये रायगड जिल्ह्याचाही समावेश आहे. रायगड जिल्ह्यासाठी ही स्पर्धा सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी मुंबई पोलीस मुख्यालय, कळंबोली येथे पार पडणार आहे. सदर स्पर्धेच्या उद्घाटनास प्रमुख पाहुणे म्हणून ऑलिंपिक खेळाडू व अर्जुन पुरस्कार विजेत्या ललिता बाबर या उपस्थित राहणार आहेत.




स्पर्धा १४ वर्षाखालील मुली आणि १६ वर्षाखालील मुली या दोन गटांसाठी घेण्यात येणार असून, रायगड जिल्ह्यातील ५० पेक्षा अधिक संस्थांमधील सुमारे ५०० ते ६०० खेळाडू सहभाग घेतील अशी अपेक्षा आहे. विशेष म्हणजे या स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क आकारले जाणार नाही.

स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना प्रमाणपत्र आणि पदकांनी गौरविण्यात येईल. तसेच AFI द्वारे नियुक्त निवड पथक या स्पर्धेदरम्यान प्रतिभावान आणि भविष्यकाळात उत्कृष्ट कामगिरी करण्याची क्षमता असलेल्या खेळाडूंची निवड करणार आहे.

या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी या स्पर्धेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

स्पर्धेसाठी प्रवेशिका १४ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० वाजेपर्यंत https://forms.gle/m6gZ3edLoksxz1VF7 या लिंकवर भरता येतील. अधिक माहितीसाठी प्रविण खुटारकर (९७७३५२५७७७) किंवा यतीराज पाटील (९९२११७१७००) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच अधिक माहिती raigadathletics.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

अस्मिता ॲथलेटिक्स लीग ही रायगड जिल्ह्यातील मुलींना त्यांच्या क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करण्यासाठी आणि पुढील स्तरावर झेप घेण्यासाठी एक उत्कृष्ट संधी आहे. या माध्यमातून ग्रामीण आणि शहरी भागातील खेळाडूंना समान व्यासपीठ मिळणार आहे. आमचा उद्देश अधिकाधिक मुलींनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, ॲथलेटिक्सला आपला करिअर पर्याय म्हणून स्वीकारावे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, हा आहे.

बाळाराम पाटील
अध्यक्ष,
रायगड जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशन

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# खाजगी शाळा आणि क्लासेसचा 'रिसॉर्टी' धंदा!

## सहलींच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ, शिक्षण विभाग निद्रिस्त ?

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी असतात पण उरणसह राज्यभरातील काही खाजगी शाळा आणि क्लासेसनी या शैक्षणिक संकल्पनेचा चक्क 'रिसॉर्ट सफरी'मध्ये' रूपांतर केल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

अलीकडेच अकोल्यातील एका खासगी क्लासने 13 विद्यार्थ्यांना घेऊन काशीद समुद्रकिनारी सहल काढली असता, पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने एका शिक्षकासह एका विद्यार्थ्याचा बुडून मृत्यू झाला. हा दुर्दैवी प्रकार घडूनही शिक्षण विभागाकडून अशा सहलींवर कोणताही प्रतिबंध किंवा नियंत्रण नसल्याचे चित्र आहे. उरण तालुक्यातही अनेक खासगी शाळा शैक्षणिक सहलींच्या नावाखाली वॉटर पार्क, रिसॉर्ट आणि मनोरंजन स्थळांवर सहली नेत आहेत.यासाठी अशा सहली बाबत अनेक व्यवसायिकांनीआपले उखळ पांढरे करत चक्क सहली काढण्याच्या कंपन्याच सुरु केल्या असून सदर कंपन्याचे दलाल विविध रिसॉर्ट.समुद्र किनारेसहलीचे दरपत्रक घेऊन शाळा शाळांमध्ये फिरत आहेत यातूनही विशेषतः शाळे च्याप्रिन्सिपॉल,मुख्याध्यापक यानाही आकर्षक कमिशन योजनाही देण्यात येते.अशीपरिस्थिती आज आहे.

खरेतर गड-किल्ले, विज्ञानकेंद्र, तारांगण, संग्रहालये अशा ज्ञानवर्धक ठिकाणी सहली नेण्याचे



बंधन असतानाही, शाळा आणि शिक्षक मात्र 'कमिशन' मिळणाऱ्या ठिकाणांकडे विद्यार्थ्यांना वळवत आहेत.

या सहलींसाठी पालकांकडून अव्वाच्या सव्वा दर आकारले जात आहेत, तर शिक्षण विभाग याकडे डोळेझाक करत असल्याने नागरिक आणि पालकवर्गामध्ये संतापाचे वातावरण आहे. उरण तालुका मराठी पत्रकार संघ यांच्याकडून या संदर्भात वारंवार तक्रारी करण्यात आल्या आहेत.

परंतु अत्यंत जाणीवपूर्वक या तक्रारीकडे दुर्लक्ष केले जात आहे. , विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी आणि जीवनाशी खेळ करणाऱ्या आणि नियमांचे उल्लंघन करून सहली काढणाऱ्या शाळा व क्लासेसविरुद्ध तात्काळ चौकशी करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी गटशिक्षणाधिकारी घरत मॅडम व गटविकास अधिकारी सर्जेराव पाटील यांच्याकडे उरण तालुका मराठी पत्रकार संघाने केली आहे.

# सोहळा उत्सव शिक्षण महर्षी कै. निंबा कृपाराम कोठावदे (वाणी गुरुजी) यांच्या जन्मशताब्दीचा,आदर्श जीवनाचा

**दैनिक युवक आधार**
**बागलाण तालुका प्रतिनिधी-दिपक गायकवाड**

**बागलाण :** आदर्श शिक्षणाचा पाया भरणीसाठी आपले संपूर्ण आयुष्य दुर्गम आदिवासी भागांत समर्पित करणारे सेवानिवृत्त शिक्षक कै. निंबा कृपाराम कोठावदे (वाणी गुरुजी) यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त बागलाण तालुक्यातील ताहाराबाद जि.प. शाळेतील शालेय विद्यार्थीना स्कूल बॅग व शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बागलाणचे विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार दिलीपजी बोरसे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार सत्यजित तांबे याचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमात बोलताना आमदार तांबे यांनी गुरुजींच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले, जेव्हा दुर्गम भागात कोणतीही सुविधा नव्हती,तेव्हा डोक्यापर्यंतच्या पाण्यातून जाऊन ज्ञानदानाचे व्रत पाळणारे वाणी गुरुजी हे केवळ शिक्षक नव्हते, ते समाज जडणघडणीचे खरे शिल्पकार होते. त्यांचा जन्म जन्म: ३ नोव्हेंबर १९२५ साली झाला.गुरुजींचे स्वप्न विद्या विना नाही उद्धार हेच ब्रिद कुटुंब आज पुढे घेऊन जात आहे, हे कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी आमदार बोरसे यांनी कोठावदे परिवाराच्या सामाजिक कार्याची प्रशंसा केली. शिक्षणाचा दीपस्तंभ, समाजसेवेचा



**(आमदार दिलीप बोरसे सह सामको संचालक सचिन कोठावदे, निखिल कासारे, दीपक कांकरिया, जीवन माळी आदी वरील चित्रात)**

महामेरू: कैलासवासी निंबा (वाणी) गुरुजींना जन्मशताब्दीनिमित्त नमन करत.संस्कारांचा वेलू गगनावेरी: एक समृद्ध कौटुंबिक वारसा

"आपण कसे जगतो, यातूनच पुढची पिढी घडते," याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोठावदे कुटुंब. गुरुजींनी दिलेले संस्कार त्यांच्या पुढच्या पिढ्यांमध्ये विविध क्षेत्रांत रुजलेले दिसतात. त्यांच्या यशस्वी वाटचालीस एक मोठा आधार मिळाला तो त्यांच्या पत्नी कैलासवासी वत्सलाबाई कोठावदे.दुर्दैवाने, वत्सलाबाईंचे १९८१ मध्ये कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराने अकाली निधन झाले. हा गुरुजींच्या आयुष्यातील एक मोठा आघात होता, परंतु त्यांनी आपले दुःख बाजूला ठेवून अधिक जोमाने आपले ज्ञानदानाचे आणि समाजसेवेचे कार्य पुढे सुरू ठेवले.गुरुजींच्या संस्कारांचा वारसा त्यांच्या पुढच्या पिढ्यांमध्ये विविध क्षेत्रांत रुजलेला दिसतो.राजकीय आणि सामाजिक सेवा यात नातू सचिन कोठावदे यांनी धुळे लोकसभा युवक काँग्रेस अध्यक्ष व समको बँकेत संचालक तसेच पत्रकारिता क्षेत्रात अनोखी छाप सोडत महत्वाची भूमिका बजावत आहेत. मोठ्या सूनबाई सौ. चंद्रकला कोठावदे व नातसून प्रीती सचिन कोठावदे यांनी ताहाराबाद ग्रामपंचायतीमध्ये विद्यमान सदस्य म्हणून सामाजिक कार्यात योगदान दिले आहे.उद्योजकता क्षेत्रात चिरंजीव श्री. दिलीप कोठावदे हे किराणा व्यवसायात स्थिर आहेत, तर तिसरे चिरंजीव श्री. राजेंद्र कोठावदे हे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातून 'वरिष्ठ मुख्यलेखा अधिकारी' या उच्च पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत.नातू श्री. रुपेश राजेंद्र कोठावदे हे पुण्यात इंजिनिअर म्हणून कार्यरत आहेत. अशा महान समाज सुधारक वाणी गुरुजी यांचा १३ एप्रिल २०१७ रोजी, अल्पशा आजाराने ज्ञानज्योत मालवली. या कार्यक्रमावेळी सेवानिवृत्त प्राचार्य पी. एन. साळवे, माजी सरपंच काशिनाथ बापूजी नंदन, सेवानिवृत्त शिक्षक बी. डी. नंदन आणि शिक्षण विस्तार अधिकारी हिरालाल बधान,सटाणा नगरपालिकेचे माजी नगरसेवक राहुल पाटील, शिवसेना तालुकाप्रमुख सुभाष नंदन, शिक्षण विस्तार अधिकारी नवनाथ पवार, केंद्रप्रमुख सुभाष शिवदे, ताहाराबाद माजी सरपंच सीताराम साळवे, मधुकर साळवे, भालचंद्र कोठावदे, दिलीप कोठावदे, मोहळागी सरपंच संगीता साबळे, काशिनाथ गवळी, चुनीलाल ठाकरे, ताहाराबाद उपसरपंच जीवन माळी, राजू गावित, महेंद्र पवार, उपसरपंच निलेश पवार, डॉ. नितीन पवार, निलेश कांकरिया, निखिल कासारे, राजेश माळी,शोभा महाजन, पिंटी गावित, नीता माळी आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक प्रकाश देवरे यांनी केले.

# मुदखेड : समाज बांधिलकीला सलाम! N.S.S. स्वयंसेवकांचा पूरग्रस्तांसाठी अनोखा मदत अभियान — १९,५५० रुपयांचा निधी मुख्यमंत्री सहायता निधीत जमा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -प्रकाश गवारे**

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांत झालेल्या अतिवृष्टीने मोठ्या प्रमाणावर हाहाकार माजवला आहे. शेतजमिनी, पिके, घरांची झालेले प्रचंड नुकसान यामुळे शेतकरी वर्ग हतबल झाला असताना, मुदखेड शहराने पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी सिद्ध केली आहे. राजीव गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) च्या स्वयंसेवकांनी "मानवतेची सेवा हीच खरी सेवा" या भावनेतून पूरग्रस्तांसाठी अनोखा मदत उपक्रम राबवून प्रशंसनीय उदाहरण घडवले आहे.

**दोन दिवस शहरभर धडाडीचे संकलन अभियान**

दिनांक ७ आणि ८ ऑक्टोबर



२०२५ रोजी स्वयंसेवकांनी मुदखेड शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठा, महाविद्यालय परिसर, तसेच सार्वजनिक ठिकाणी फिरत निधी संकलनाचे मोठे अभियान राबविले. विद्यार्थ्यांनी हातात मदत पेट्या घेऊन नागरिकांना योगदान देण्याचे आवाहन केले. त्यांच्या या संवेदनशील आणि मनापासूनच्या प्रयत्नांनी अनेक नागरिक स्वखुशीने पुढे सरसावले.

महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही "फुल नाहीतर फुलाची पाकळी" या भावनेतून मदत देत तरुणाईच्या सामाजिक जाणिवेला बळकटी दिली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमातील उत्साहामुळे परिसरात सर्वत्र कौतुकाची भावना निर्माण झाली.

**१९,५५० रुपयांचा निधी जमा — थेट मुख्यमंत्री सहायता निधीत**

या संकलित उपक्रमातून एकूण १९,५५०/- रुपये इतका मदत निधी जमा करण्यात आला. महाविद्यालय प्रशासनाने हा संपूर्ण निधी पूरग्रस्तांच्या मदतीसाठी थेट मुख्यमंत्री सहायता निधी, महाराष्ट्र राज्य कडे सुपूर्त करण्याचा निर्णय घेतला.

कार्यक्रमाधिकारी प्रकाश कोथळे, प्रा. डॉ. आर. एस. कोंडेकर आणि क्रीडा प्रमुख अर्जुनसिंग ठाकूर यांनी संयुक्तपणे हा धनादेश निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी किरण आंबेकर यांच्याकडे औपचारिकरित्या सुपूर्त केला. अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या कार्याचे मनापासून कौतुक करत अभिनंदन केले.

**समाजसेवेचे जिवंत उदाहरण**

या उपक्रमातून मुदखेड शहरातील तरुणाईने संकटग्रस्तांसाठी कळकळ, सामाजिक मूल्ये, मानवता आणि राष्ट्रीय सेवाभाव यांची खरी प्रतिमा साकारली आहे. विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेची सर्वत्र प्रशंसा होत असून समाजात सकारात्मकतेचा संदेश पोहोचत आहे.पूरग्रस्तांच्या मदतीसाठी केलेले हे योगदान "युवा शक्तीची खरी ताकद" असल्याचे मत नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रशासनाकडून व्यक्त होत आहे.

# थंडी वाढली, शेकोट्या पेटू लागल्या, स्वेटर; मफलर; कानटोप्या, आदींचा वापर सुरू

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार :** पावसाने माघार घेतल्यानंतर तालुक्यात गुलाबी थंडी ऐवजी सरळ कडाक्याच्या थंडीचे आगमन झाले आहे. रात्री तापमान १९ अंशापर्यंत पर्यंत खाली येत असल्याने ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागले आहेत. वर्षभर कपाटात पडलेले स्वेटर, मफलर, कानटोप्या, बाहेर निघताना दिसत आहेत.

प्रत्येक वर्षी कमी प्रमाणात येणाऱ्या पावसाने यावर्षी प्रमाणापेक्षा जास्त येऊन शेतकऱ्यांची दैना उडवली होती. दिवाळी होऊन गेली तरी पाऊस थांबायला तयार नव्हता. गेल्यात पाच-सहा दिवसांपासून पावसाने आपला मोसम संपल्याचे दाखवले. प्रत्येक वर्षी पावसाळा संपल्यानंतर सर्वत्र हवीहवीशी



वाटणाऱ्या गुलाबी थंडीचे आगमन होत असते. गुलाबी थंडी नंतर बोचरी थंडी अनुभवायला मिळत असते. त्यानंतर नको नकोशी वाटणारी कडाक्याची थंडी आपले रूप दाखवत असते. यावर्षी मात्र सर्वत्र हिरवळ आणि ओलावा असल्याने पावसाळ्यानंतर कडाक्याच्या थंडीनेच आगमन केले आहे. त्यामुळे सकाळ-संध्याकाळ ग्रामीण भागात शेकोट्या पेटू लागल्याचे चित्र दिसत आहे. वर्षभर कपाटात पडलेले स्वेटर, मफलर, कानटोप्या आदी गोष्टींचा वापर सुरू झाला आहे. गेल्या आठ दिवसातच तापमानात कमालीची घट होताना दिसून असून कधीकधी पारा १९ अंशांपेक्षाही खाली आल्याचे दिसून येते.

# रजनीकांत बोरेले आडतदार खरीदार मध्ये सोयाबीन 4825 प्रति क्विंटल भाव देशात कुठेच नाही हा भाव

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी तालुका प्रतिनिधी - महेश पेन्दोर**

पांढरकवडा येथील अपक्ष संचालक आणि प्रशिद्द व्हिसल ब्लोअर रजनीकांत बोरेले यांची कृषी उत्पन्न बाजार समिती पांढरकवडा येथे खरेदी आणि आडत आहे.शेतकरी यांचा नुकसान होवू नये म्हणून ते स्वात: खरेदी वर हजर राहुन लीलाव करतात त्या मुळे लीलावात संकल बनत नाही. आजच्या तारखेला 4825, सोयाबीन चे प्रति क्विंटल भाव प्लांट ला सोडा तर देशात कुठे नाही.

रजनीकांत बोरेले यांच्या नावावर शेतकरी हा धान्य आणते इतका विस्वास त्यांच्या वर शेतकरी यांचा आहे. रजनीकांत बोरेले यांच्या आडतआणि खरेदारी मध्ये मामूल दिल्या जात नाही. त्यांचे म्हणजे आहे मामूल देने म्हणजे शेतकरी यांना लूटुंन देने आहे अडते किवा



खरीदार घरातून देत नाही आणि आपण मार्केट ला शेतकऱ्यांना उत्कृष्ट भाव कसा देता येते या करीता आहे.

दिनांक 11/11/2025 रोजी रजनीकांत बोरेले यांच्या आडत- खरेदी मध्ये मोठे 4 ढिगला होते ते चार ही ढिग 4825 चे दोन आणि एक ढिगला4800 आणि एक ढिगला 4775 रुपये प्रति क्विंटल प्रमाणे गेला आहे राजनिकन बोरेले यांचे भाव चांगलेच असते त्या मुळे शेतकरी त्यांचे धान्य बोरेले यांच्या नावावर घेवून येतात.

महत्वाची बाब म्हणजे पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समिति चा अधिकृत शुभारंभ दिनांक 27/10/2025 रोजी केला होता त्या वेळी भाव मूहुर्तवर 2700 से ते 4000 होते आणि बोरेले यांचा महूर्त 30/10/2025 ला होता तरी शेतकऱ्यांनी त्यांचे सोयाबीन तीन दिवस पर्यन्त ढिगला टाकून वाट पाहिली आणि महूर्त वर 4500 चा भाव बोरेले यांनी दिला होता हे विशेष

# सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक फेडरेशनच्या राज्य उपाध्यक्षपदी कॉ.शिलाताई ठाकुर तर राज्यकमिटी पदी कॉ.वर्षाताई सांगडे यांची निवड

**परळी येथे उत्साहात संपन्न झाले ४ थे राज्य अधिवेशन,**

**दैनिक युवक आधार**
**माहुर (प्रतिनिधी) सय्यद ईसा**

सीटू संलग्न आशा व गटप्रवर्तक फेडरेशनच्या चौथे राज्य अधिवेशन परळी ( वैजनाथ ) येथील प्रवचन मंडपात ८ व ९ नोव्हेंबर रोजी उत्साहात सपन्न झाले.परळी शहरात मोठी रॅली काढून जाहीर सभा घेण्यात आली.उपरोक्त अधिवेशनासाठी उदघाटक म्हणून फेडरेशनच्या राष्ट्रीय महासचिव कॉ.मधुमिता



बंडोपाध्याय ह्या होत्या.निवडक प्रतिनिधी या अधिवेशनात सहभागी झाले होते.राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा कणा असलेल्या आशा व गटप्रवर्तक ताई मोठ्या संख्येने परळी शहरात दाखल झाल्या होत्या.

सदरील अधिवेशन दोन दिवशीय झाले असून सीटूचे राष्ट्रीय उपाध्यक्ष तथा राज्याचे अध्यक्ष कॉ.डॉ.डी.एल. कराड, राज्य महासचिव कॉ.ॲड. एम.एच.शेख याची प्रमुख उपस्थिती आहे.मंचावर कॉ.आनंदी अवघडे, कॉ. पुष्पा पाटील,कॉ. शुभा शमीम, कॉ. आरमायटी इराणी कॉ. प्राची हतीवलेकर, कॉ.उज्वला पडलवार, कॉ. डॉ.अशोक थोरात, कॉ.प्रभाकर नागरगोजे, कॉ.मंगल ठोंबरे आदींची उपस्थिती आहे.

या अधिवेशनात अध्यक्षपदी कॉ. आनंदी अवघडे, राज्य महासचिवपदी कॉ.पुष्पा पाटील तर खजिनदारपदी कॉ.अर्चना घुगरे यांची एकमताने निवड करण्यात आली.नांदेड येथील कॉ.शिलाताई ठाकूर यांची राज्य उपाध्यक्षपदी तर कॉ. वर्षाताई सांगडे यांची राज्य कमिटी सदस्य पदी निवड करण्यात आली. सीटू जिल्हा कमिटीच्या वतीने नूतन राज्य कमिटीचे अभिनंदन करण्यात आले.अशी माहिती सीटू कामगार संघटनेचे जिल्हा जनरल सेक्रेटरी कॉ.गंगाधर गायकवाड यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# अखंड ६६ वर्ष दिंडी सोहळ्याची परंपरा आमच्या हातून सदैव घडत राहो - शत्रुघ्न कणसे

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना (अशोक ठोके)**

सध्याच्या काळात प्रत्येकजण तणावात आहे. शंभर टक्के निरोगी कुणीच नाही. त्यावर एकच औषध आहे, ते म्हणजे 'रामनाम' नामस्मरण. हा सर्व हिंदू संप्रदायांचा मूलमंत्र आहे. यातील रामाचा विचार, कृष्णाचा आचार आणि हरीचा उच्चार करा,त्यामुळे तणावातून मुक्तता व स्वतःची,देशाला प्रगतीही मिळेल. त्यासाठी श्रद्धेने भगवंताचे नामस्मरण करायला हवे, अशी



भावना आळंदी येथील प्रसिद्ध कीर्तनकार,आवाजाचे जादुगर पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी व्यक्त केली. ते काल दिंडी सोहळ्या निमित्त कणसे परिवाराच्या वतीने हरेराम नगर , दैठणा बुद्रुक, तालुका परतूर, जी. जालना येथे आयोजित भव्य कीर्तन महोत्सवाच्या निमित्ताने समस्त समाज बांधवांना प्रबोधन करत होते.पुरुषोत्तम महाराज पाटील म्हणाले की, संत ज्ञानेश्वर माऊली यांनी ज्ञानाच्या माध्यमातून सर्वांना उपदेश केला म्हणून ते वयापेक्षा ज्ञानाने श्रेष्ठ ठरतात. माऊली हे ज्ञानियांचे ज्ञानी आहेत. मुक्तपणे आपल्या माणसांजवळ व्यक्त व्हा मोकळेपणाने बोला. त्यामुळे मानसिक ताण,अल्प होतो. सध्या आपण घरातल्या घरात तसेच शेजाऱ्यांशी बोलत नाही. मनःशांती मिळण्यासाठी सर्व जुने विसरून एकमेकांशी बोला,असे आवाहनही त्यांनी केले.प्रती वर्षा प्रमाणे परंपरे प्रमाणे सलग ६६ व्या वर्षी सुद्धा कोणताही खंड न पडता आपल्या कणसे परिवाराच्या वतीने सुरू असलेल्या परंपरेला कोणताही फाटा न देता, न चुकता भव्य अश्या कीर्तन दिंडी सोहळा साजरा करतात म्हणून समाज बांधवांनी कणसे परिवाराचा आदर्श घेऊन असे कार्यक्रम आयोजित करून आदर्श निर्माण करावा असे आवाहन ही यावेळी मान्यवरांकडून करण्यात आले

यावेळी परतूर तालुक्यातील गुणवंत वादक गायक मृदंगाचार्य वारकरी मंडळ सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवर व भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटिस

नमुना एन डी
(नियम ९२(३) पहा)

लोकांच्या महितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की,परवाना क्र. 16366DOM गाडी न.MH2024-GP-4899K मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र.MH05DL8144 चे मालक कै.भालचंद्र शिवा म्हात्रे याचं दिनांक 23/05/2024 रोजी निधन झाले आहे.

मी
**कविता भालचंद्र म्हात्रे देसाई,**
**कल्याण - शील रोड, दत्त मंदिरापुढे,**
**तांबडीचा पाडा, पडले, ठाणे. महाराष्ट्र - 421204.**

उपरोल्लेखीत वाहनाच्या कब्जाचा उत्तरधीकारी असल्यामूळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे.आणि त्यानुसार त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तातरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे आर्ज केला आहे.

याबाबतीत कोणत्याही दावा सांगणारया किंवा हरकत आसलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालय पनवेल रायगडच्या निधर्षनास आणुन दिले पाहीजे.

**उत्तरआधिकारचे नाव-**
**कविता भालचंद्र म्हात्रे देसाई, कल्याण शील रोड,**
**दत्त मंदिरापुढे, तांबडीचा पाडा,**
**पडले, ठाणे. महाराष्ट्र - 421204.**

## धाडसी कृतीने वाचवले जीव — मनप्रीतसिंग आहुजा यांचे मा. आमदार श्री. सदा सरवणकर आणि मा. नगरसेवक श्री. समाधान सरवणकर यांच्या कडून कौतुक

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर,**
**मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**





मनोरमा नaगरकर मार्गावरील आर. के. बिल्डिंगच्या दुसऱ्या मजल्यावर सोमवारी दुपारी मीटर बॉक्समध्ये अचानक शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. आगीचा धूर संपूर्ण जिन्यात पसरल्याने तिसऱ्या मजल्यावरील काही रहिवासी काही काळासाठी आत अडकले होते. मात्र, तेथे राहणारे श्री. मनप्रीतसिंग आहुजा (साहिल) व त्यांच्या मित्रांनी धाडस दाखवत तात्काळ फायर ब्रिगेडला माहिती दिली आणि स्वतःच पुढाकार घेऊन अडकलेल्या नागरिकांना सुखरूप बाहेर काढले.

या वेळी एका लहान बाळासह सर्वांना सुरक्षिततरीत्या बाहेर काढण्यात यश आले. आगीची माहिती मिळताच फायर ब्रिगेडचे जवान तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि अल्पावधीतच आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र काही मीटर बॉक्स व भिंतींचे किरकोळ नुकसान झाले.घटनेची माहिती मिळताच मा. आमदार श्री. सदा सरवणकर आणि मा. नगरसेवक श्री. समाधान सरवणकर यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी रहिवाशांना दिलासा देत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. या वेळी शिवसेना पदाधिकारी श्री. कुणाल वाडेकर (विधानसभा प्रमुख), श्री. राजू नाईक (उपविभाग प्रमुख), श्री. महेंद्र पांडे, श्री. संतोष नार्वेकर आणि श्री. नितीन चव्हाण (स्थानिक उपशाखा प्रमुख) उपस्थित होते. रहिवाशांनी मनप्रीतसिंग आहुजा (साहिल) व त्यांच्या मित्रांच्या तत्पर आणि मानवतावादी कृतीचे कौतुक केले. त्यांच्या धाडसामुळे संभाव्य मोठा अपघात टळला आणि अनेकांचे जीव वाचले.

समाजासाठी प्रेरणादायी ठरलेल्या या घटनेमुळे स्थानिकांकडून त्यांना मनापासून शुभेच्छा आणि अभिनंदन मिळत आहे.

## वाडा येथे कर्मवीर भाऊराव पाटील या विद्यालयात 'स्नेह संमेलन आणि गुरूभेट' कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**
**डॉ. देवेंद्र ओव्हाळ खेड पुणे**



सन १९७५ ते १९९० या कालखंडातील गुरुवर्य व विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यक्रमाला उपस्थितकार्यक्रमाचे उदघाटक आदरणीय श्री निकम सर व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री काकडे सर सहपरिवार उपस्थितनियोजनात बाळासाहेब मेदगे, दिलीप कडलग, दीपक कहाणे, राजेंद्र उबाळे, सुनील आढाव, सविता सोनवणे यांचा सहभाग दिनांक नऊ नोव्हेंबर दोन हजार पंचविस रोजी नवीन वाडा गावात एक दिमाखदार सोहळा पार पडला. कर्मवीर भाऊराव पाटील या विद्यालयात स्नेह संमेलन आणि गुरूभेट असे शीर्षक लाभलेला कार्यक्रम जल्लोषात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी जवळ पास पाच महिन्यापासून तयारी चालू केली होती. परंतु पावसाच्या अवकाळी रौद्र रूपाने तो नऊ नोव्हेंबर रोजी वाडा शाळेच्या प्रांगणात घेण्यात आला. सन १९७५ ते १९९० या दरम्यान ज्या गुरुवर्यांनी या शाळेतील मुलांना घडवले असे गुरू या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. तसेच प्राथमिक शाळेत ज्या शिक्षकांनी त्या काळातील विद्यार्थ्यांना ज्ञान अमृत पाजले असे जीवन शिक्षण मंदिर वाडा या शाळेतील गुरुजी आणि मॅडम या देखील या कार्यक्रमाला उपस्थित होत्या.शाळेच्या प्रवेश द्वारा पासून तर व्यासपीठापर्यंत गुरूंची, विद्यार्थ्यां-विद्यार्थिनींची, एक शोभायात्रा तद्वत पद यात्रा काढण्यात आली होती. या पदयात्रेत सगळ्यांच्या अंगात पांढरा कुर्ता पायजमा, डोक्यावर भगव्या रंगाचा फेटा, खिशाला भगव्या रंगाचा बॅच तर विद्यार्थिनींनी भारतीय नारीला शोभेल अशा सहावारी साडी व डोक्यावर भगव्या रंगाचा फेटा भगव्या रंगाचा बॅच लावून आल्या होत्या. ही पदयात्रा छत्रपती शिवाजी महाराज की जय! जय शिवाजी जय भवानी! कर्मवीर भाऊराव पाटलांचा विजय असो! अशा जयघोषात पार पडली. व्यासपीठाच्या दर्शनी भागात सर्व गुरुवर्यांचे कुंकुम तिलक व पाद्यपूजन करण्यात आले. गुरू प्रति प्रेमभाव साकारताना त्यांच्या वर पुष्पवृष्टी करण्यात आली. गुरुवर्य व्यासपीठावर स्थानापन्न झाल्या नंतर शालेय परिपाठ, स्वागतगीत, अध्यक्षीय निवड, असे कार्यक्रम झाले. सदर कार्यक्रमाचे उदघाटक आदरणीय श्री निकम सर व कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री काकडे सर सहपरिवार आवर्जून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी सर्वात ज्येष्ठ असणाऱ्या कल्पना ताई केदारी यांनी केले तर प्रास्ताविक भाषण माजी विद्यार्थी राहिलेले मोहकल शाळेचे मुख्याध्यापक आदरणीय संजय नाईकरे सर यांनी केले. आभार प्रदर्शन विद्यालयाचे माजी विद्यार्थी, कार्यक्रमाचे केंद्रबिंदू राहिलेले बाळासाहेब मेदगे यांनी केले. या प्रसंगी विद्यालयाच्या वतीने विद्यालयाचे शिक्षक आदरणीय विलास लोखंडे सर यांनी गुरुवर्यामध्ये काकडे सर, विद्यार्थ्यांमध्ये बाळासाहेब मेदगे, तर विद्यार्थिनीं मध्ये सविता सोनवणे यांच्या सत्काराचा प्रस्ताव मांडला तो सत्कार गुरूंच्या हस्ते शाल आणि पुष्प गुच्छ देऊन केला.सर्व गुरुवर्य यांना शाळेत शिकवत असलेल्या विषयाचा उल्लेख करून त्यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करणारे सन्माचिन्ह, शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बऱ्याच विद्यार्थ्यांचा त्यांच्या कार्यक्षेत्रात पदोन्नती झाल्यामुळे विशेष सत्कार उपस्थित गुरूंच्या हस्ते करण्यात आला. १९८४ या वर्षातील एस एस सी मधील प्रथम क्रमांकाचे मानकरी दत्तात्रय सातव यांचा सत्कार त्यांचेच वर्गशिक्षक राहिलेले आदरणीय निकम सर यांनी केला. या प्रसंगी सिनेकलावंत, टीव्हीस्टार दत्ताभाऊ उबाळे, ब्रह्मांडकट्टा या ऑर्केस्ट्रातील प्रमुख गायक सावनकुमार सुपे यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला.

सदर कार्यक्रमाच्या नियोजनात बाळासाहेब मेदगे, दिलीप कडलग, दीपक कहाणे, राजेंद्र उबाळे, सुनील आढाव, सविता सोनवणे यांनी भाग घेतला होता.अत्यंत नीटनेटके आणि प्रशंसनीय नियोजन झाल्याची ग्वाही गुरुवर्य यांनी दिली. स्नेहभोजन आणि व्यासपीठ सजावट, तिफणवाडीचे सागर कडलग यांनी अफलातून केली होती. स्नेह भोजनानंतर चाळीस वर्षापूर्वी जो कुल्फीवाला कुल्फी विकत होता त्यांना आणण्याचे काम आयोजकांनी केले होते. कुल्फी घेताना सगळ्यांना त्या दिवसाची आठवण झाली. या कार्यक्रमासाठी औदर गावातील सहा विद्यार्थी की जे पहिलीपासून एकत्रच शिकले यांनी विशेष योगदान दिले होते. असा हा रंगतदार कार्यक्रम वाडा शाळेत प्रचंड जल्लोषात साजरा करताना विखुरलेली पाखरे जशी एकत्र येतात तशी सगळी तिथे जुन्या आठवणी काढत आली आणि एक नयनरम्य सोहळा पार पडला.

## लाल मातीतील हिरा पैलवान तानाजी चवरे ( आप्पा) यांच्या वाढदिवसानिमित्त साळशिरंबे तालुका कराड येथे जंगी कुस्ती मैदान

**दैनिक युवक आधार**

**कराड वार्ताहर** : महाराष्ट्र मध्ये कुस्ती क्षेत्रात नावलौकिक व अनेक पुरस्कारांचे मानकरी असणारे श्री पैलवान तानाजी चवरे (आप्पा ) यांचा वाढदिवस १५ नोव्हेंबर २०२५ रोजी आहे. आप्पांच्या वाढदिवसानिमित्त साळशिरंबे तालुका कराड येथे जंगी कुस्त्यांचे मैदान आयोजित केले आहे. कराड कुस्ती संघ व कला क्रीडा सांस्कृतिक या ट्रस्टच्या माध्यमातून कुस्ती संघटना कराड तालुक्यात पुनर्जीवित करण्याचे काम आप्पांनी केले. कोरोना काळातील कुस्ती क्षेत्रात उभारी आणण्याचे योगदान त्यांनी केले.




दरवर्षी कुस्ती मैदान गुणगौरव व सन्मान सोहळा कर्तुत्वान नागरिकांचा या मैदानातत होत असते.साळ शिरंबे येथील कुस्ती मैदानात कराड तालुका आदर्श पैलवान पुरस्कार २०२५ मध्ये अक्षय मोहिते (बेलवडे), चैतन्य कणसे उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी (RTO), रमेश गर्जे उत्कृष्ट प्रशासकीय अधिकारी (सायबर पोलीस अधीक्षक सातारा), विलास देशमुख, हरिभाऊ साठे, बाबासाहेब तोरणे, प्रज्ञेश चवरे, सत्यम पाटील, अजिंक्य पाटील दिनकरराव थोरात, अमोल पाटील यांचा गुणगौरव सन्मान सोहळा कुस्ती मैदानात पार पडणार आहे. महाराष्ट्रातील ज्येष्ठ कुस्ती निवेदक पैलवान शंकर पुजारी यांना महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

कुस्ती मैदानासाठी कराड दक्षिणचे विद्यमान आमदार श्री अतुल बाबा भोसले, कराड उत्तरचे आमदार मनोज दादा घोरपडे, शिराळा मतदार संघाचे आमदार श्री सत्यजित देशमुख, डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील, सम्राट महाडिक, दत्तात्रय देसाई, विराज नाईक, हर्षवर्धन मोहिते, संतोष वेताळ, आप्पासाहेब कदम, धनंजय पाटील, संजय शेवाळे, ऋतुराज काळे ,दीपक पाटील ,पैलवान माऊली उबाळे ,बाळासाहेब पाटील ,मारुतीराव नलावडे, संदीप खोचरे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

साळशिरंबे येथील कुस्ती मैदानात मैदानात प्रसिद्ध निवेदक चंद्रकांत कोकाटे , ज्येष्ठ कुस्ती निवेदक ईश्वरा पाटील, श्री जाधव चिंचोली यांचा आवाज घुमणार आहे. या वाढदिवसानिमित्त कुस्ती संघटक पैलवान तानाजी चवरे (आप्पा) वाढदिवस उत्सव कमिटी व कराड तालुका कुस्ती संघटना यांच्यातर्फे कुस्ती आखाड्याचे नियोजन करण्यात आले आहे. तसेच कुस्ती शौकिनांना आव्हान करण्यात येत आहे आपणही कुस्ती मैदानाला भेट देऊन शोभा वाढवावी.

## झिरो माईल' विकास प्रकल्पाला केंद्राची साथ; समन्वयासाठी दोन अधिकारी नियुक्त

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक युवक आधार प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर**

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर** : नागपूरच्या ऐतिहासिक झिरो माईल स्मारकाच्या विकासासाठी आता केंद्र शासनाचे सहकार्य मिळणार आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठपुराव्यानंतर केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाने या प्रकल्पासाठी दोन अधिकारी समन्वयासाठी नेमले आहेत.

मुख्यमंत्री कार्यालयातून केंद्र शासनाकडे झिरो माईल स्मारक स्थळाचा सांस्कृतिक वारसा म्हणून विकासासंदर्भात पाठवलेल्या पत्रावर कार्यवाही करत केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सचिव अभय करंदीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

या पत्रात करंदीकर यांनी नमूद केले आहे की, नागपूर महानगरपालिका झिरो माईल स्मारकाच्या नूतनीकरण, आधुनिकीकरण आणि विकासाची कामे राबवत आहे. हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा असून केंद्र सरकार या प्रकल्पासाठी संपूर्ण सहकार्य करेल. यासाठी सर्व्हे ऑफ इंडिया विभागामार्फत दोन अधिकारी समन्वयासाठी नेमण्यात आले आहेत.

अतिरिक्त सर्वेयर जनरल संदीप श्रीवास्तव यांची नोडल अधिकारी म्हणून तर सर्व्हे ऑफ इंडिया, पुणेचे संचालक ए. के. सिंह यांची सहाय्यक अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. हे अधिकारी राज्य सरकार व स्थानिक प्रशासनाशी समन्वय साधून प्रकल्पाची अंमलबजावणी करतील.

झिरो माईल हे भारताचा भौगोलिक केंद्रबिंदू मानला जातो. या स्मारकाचा विकास केवळ नागपूरच्या ऐतिहासिक ओळखीत भर घालणार नाही, तर शहरातील सांस्कृतिक आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना देणार आहे.

झिरो माईल हे स्मारकाचा विकास हा नागपूरच्या वारशाला नवी दिशा देणारा प्रकल्प ठरणार आहे. केंद्र सरकारकडून मिळालेल्या सहकार्यामुळे हा परिसर जागतिक दर्जाच्या वारसा स्थळाप्रमाणे विकसित होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

## प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करुन नग्नावस्थेतील फोटो सोशल मीडियावर केले व्हायरल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** सीवुडस् येथील नामांकित महाविद्यालयातील २२ वर्षीय तरुणाने आपल्या प्रेयसीवर लैंगिक अत्याचार करुन तिचे नग्नावस्थेतील फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

अॅनेक्स जोशी (२२) असे या तरुणाचे नाव असून पनवेल शहर पोलिसांनी त्याचा शोध सुरु केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, या घटनेतील पीडित तरुणी भायखळा येथे राहण्यास आहे, तर आरोपी अॅनेक्स जोशी सीवुडस् येथील महाविद्यालयात शिक्षण घेत असून त्याच महाविद्यालयाच्या वसतिगृहात तो राहत आहे. २ वर्षांपूर्वी पीडित तरुणीची ओळख तिची मैत्रिण आणि तिच्या प्रियकराच्या माध्यमातून अॅनेक्स जोशी याच्यासोबत झाली होती. सदर ओळख हळूहळू मैत्रीतून प्रेमात परिवर्तित झाली. जानेवारी २०२४ मध्ये अॅनेक्स जोशी याने पीडित तरुणीला पनवेलमधील फॉरेस्ट कॉलनी परिसरातील एका हॉटेलमध्ये नेले. तेथे त्याने जबरदस्तीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यावेळी तिच्या नकळत नग्नावस्थेतील तिचे फोटो आणि व्हिडिओ काढले,

असे पीडित तरुणीने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे. काही दिवसांपूर्वी आरोपीने सदर फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. या प्रकरणाची माहिती पीडितेच्या मैत्रिणीच्या प्रियकराच्या लक्षात आल्यानंतर त्याने त्याबाबत पीडित तरुणीला माहिती दिली. त्यानंतर पीडितेने अॅनेक्स जोशी याला जाब विचारला असता, त्याने उलट तिला धमकी दिली. यानंतर पीडित तरुणीने भायखळा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी आरोपी अॅनेक्स जोशी याच्या विरुध्द बलात्कार, धमकी देणे आणि माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.

सदर गुन्ह्याची सुरुवात पनवेलमधील हॉटेलमध्ये झाल्याने सदरचा गुन्हा पुढील तपासासाठी पनवेल शहर पोलीसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

पनवेल शहर पोलिसांनी या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन आरोपीचा शोध सुरु केला आहे.

## मा. कुंदन कटारे यांची लोधी समाज गोंदिया जिलाध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी**

**नागपूर :** उपराजधानी नागपूर येथील सहकारी बँक हॉल, गांधी सागर येथे अखिल भारतीय लोधा लोधी लोध महासभेच्या वतीने आयोजित युवक-युवती परिचय संमेलनात गोंदिया जिल्ह्यातील समाजसेवक मा. कुंदन डूडीराम कटारे (चिरामण टोला, कामठा) यांची लोधी समाज गोंदिया जिलाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. या कार्यक्रमास राष्ट्रीय अध्यक्ष तथा उत्तर प्रदेशचे आमदार श्री (डेविड) विपिन वर्मा, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष श्री तेनसिंग लोधा, राष्ट्रीय सचिव तेजसिंह सावजी, राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रवीण कान्होले व दत्तूसिंह परदेसी, तसेच विविध राष्ट्रीय व प्रांतीय पदाधिकारी उपस्थित होते.स्व. पुनाजी लिल्हारे यांच्या निधनानंतर जिलाध्यक्ष पद रिक्त होते. कुंदन कटारे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय अध्यक्ष विपिन वर्मा यांनी त्यांची नियुक्ती केली. कुंदन भाऊ हे गेली २५ वर्षे



सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात कार्यरत असून सेवा सहकारी संस्थेचे अध्यक्ष, जिल्हा परिषद सदस्य, बाजार समिती संचालक, तसेच धान गिरणीचे अध्यक्ष अशा जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीपणे सांभाळल्या आहेत.

नियुक्तीनंतर कुंदन भाऊ कटारे म्हणाले की, "ही नियुक्ती संपूर्ण लोधी समाजाची आहे. समाजातील युवा शक्ती, नारीशक्ती आणि शेतकरी बांधवांसोबत एकत्र येऊन शिक्षित, नशामुक्त आणि सशक्त समाज घडविणे, तसेच महाराष्ट्रातील लोधी समाजाला केंद्राच्या ओबीसी यादीत समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे, हेच माझे उद्दिष्ट आहे."

या नियुक्तीबद्दल गोंदिया जिल्ह्यात सर्वत्र आनंदाचे वातावरण असून लोधी समाजाच्या विविध स्तरांवरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे. समाजातील सर्व मान्यवरांनी कुंदन भाऊंचे कौतुक करत त्यांच्या नेतृत्वाखाली लोधी समाज गोंदिया जिल्हा अधिक सक्षम व प्रगत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

## पाथरी बाजार समितीत ५ विरुद्ध १३ अविश्वास ठराव पारित
## बाजार समिती परिसराला छावणीचे स्वरूप; पोलिसांचा कडक बंदोबस्त

**दैनिक युवक आधार**

**पाथरी (प्रतिनिधी) :** पाथरी कृषी उत्पन्न बाजार समितीतील सत्तांतराच्या हालचालींना आज अखेर यश आले. सभापती अनिल नखाते यांच्याविरोधात दाखल झालेला अविश्वास ठराव आज (दि. ११ नोव्हेंबर) पारित झाला असून ५ विरुद्ध १३ अशा मतांनी हा ठराव मंजूर करण्यात आला. त्यामुळे नखाते यांना सभापती पदाचा राजीनामा द्यावा लागला आहे.



शिवसेनेच्या काही संचालकांनी काँग्रेस जिल्हाध्यक्ष आ. बाबाजानी दुर्राणी यांच्याशी हातमिळवणी केल्यानंतर ही राजकीय उलथापालथ घडली. नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या तोंडावर झालेली ही घटना शिवसेना नेते सईद खान आणि राष्ट्रवादीचे आमदार राजेश विटेकर यांच्यासाठी मोठा धक्का मानला जात आहे.

"राजकीय समीकरणामुळे आम्ही काँग्रेससोबत गेलो असलो, तरी आमची विचारधारा शिवसेनेचीच आहे. आम्ही सर्व संचालक आजही शिवसेनेतच आहोत," असे संचालक पप्पू घाडगे यांनी स्पष्ट केले.

**दुर्राणी यांच्या नेतृत्वाखाली पुढील रणनीती**

अविश्वास ठरावानंतर सर्व १३ संचालकांनी काँग्रेस जिल्हाध्यक्ष आ. बाबाजानी दुर्राणी यांच्यासोबत गार्डन हाऊस येथे एकत्र येऊन भोजनाचा आनंद घेत आगामी सभापती निवडीसंदर्भात चर्चा केली. या बैठकीनंतर दुर्राणी हेच या घडामोडींचे मुख्य सूत्रधार असल्याचे स्पष्ट झाले असून त्यांनी सईद खान आणि आमदार राजेश विटेकर यांना राजकीय शह दिला, असे बोलले जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# मंत्रिमंडळाची महत्त्वपूर्ण निर्णय; सहकारी बँकांना ८२७ कोटींचे भागभांडवल, न्यायालय सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षक, वित्त आयोग अंमलबजावणी कालावधी वाढला

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** महाराष्ट्र मंत्रिमंडळाने आज मंगळवार, दि. ११ नोव्हेंबर २०२५ रोजी झालेल्या बैठकीत सहकार, विधी व न्याय, वित्त आणि जलसंपदा विभागाशी संबंधित अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. या निर्णयांमध्ये नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना एकूण ८२७ कोटी रुपयांचे शासकीय भागभांडवल, न्यायालयीन संकुल आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षकांची तरतूद, पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढवणे तसेच हिंगोली जिल्ह्यातील दोन साठवण तलाव प्रकल्पांसाठी २१४ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजुरी यांचा समावेश आहे. हे निर्णय राज्याच्या आर्थिक स्थैर्य, न्याय व्यवस्थेच्या सुरक्षिततेसह ग्रामीण विकासाला चालना देणारे ठरणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयांची संक्षिप्त माहिती मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाच्या जनसंपर्क कक्षाकडून जारी करण्यात आली. या निर्णयांमुळे सहकारी क्षेत्राला मजबुती मिळेल, न्यायालयीन व्यवस्थेची सुरक्षा वाढेल, स्थानिक स्वराज्य संस्थांना वित्तीय आधार मिळेल आणि हिंगोलीसारख्या मागास जिल्ह्यातील पाणीटंचाईवर मात करण्यासाठी नवे प्रकल्प राबवता येतील.

**सहकार विभाग : नाशिक, नागपूर व धाराशिव मध्यवर्ती बँकांना ८२७ कोटींचे भागभांडवल**

सहकार विभागाच्या निर्णयानुसार, नाशिक, नागपूर आणि धाराशिव (पूर्वीचे उस्मानाबाद) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना शासकीय भागभांडवल म्हणून एकूण ८२७ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या बँकांना स्थानिक शेतकरी, छोटे उद्योजक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला आधार देण्यासाठी हा निधी उपलब्ध होईल. या निर्णयामुळे बँकांचे भांडवल वाढेल, कर्जवाटप क्षमता सुधारेल आणि सहकारी बँकिंग व्यवस्थेला नवीन गती मिळेल. राज्य सरकारच्या सहकार धोरणानुसार, अशा प्रकारची भागभांडवल तरतूद ग्रामीण भागातील आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणारी आहे. या निर्णयाचा फायदा लाखो शेतकरी आणि छोट्या व्यावसायिकांना होईल, अशी अपेक्षा आहे.

**विधी व न्याय विभाग : न्यायालयीन संकुल व निवासस्थानांच्या सुरक्षेसाठी अतिरिक्त रक्षक**

विधी व न्याय विभागाच्या निर्णयात न्यायालयीन संकुल आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानांच्या सुरक्षेत वाढ करण्यासाठी महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाकडून अतिरिक्त सुरक्षारक्षक उपलब्ध करून घेण्यास मान्यता देण्यात आली आहे. या उपक्रमासाठी लागणारा खर्च आणि तरतुदीला मंत्रिमंडळाने हिरवी झेंडा दिला आहे. वाढत्या धमकी आणि सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला असून, न्यायाधीशांच्या सुरक्षिततेसह न्यायालयीन कार्यप्रणाली अधिक प्रभावी होईल. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे सरकारचे स्वतःचे उपक्रम असल्याने, या रक्षकांची नियुक्ती जलद आणि विश्वसनीय होईल. या निर्णयामुळे राज्यातील सर्व उच्च आणि खालच्या न्यायालयांमध्ये सुरक्षेचा दर्जा उंचावेल, ज्यामुळे न्यायदान प्रक्रिया अधिक सुरक्षित राहील.

**वित्त विभाग : पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोग अहवाल अंमलबजावणीचा कालावधी वाढला**

वित्त विभागाच्या निर्णयानुसार, पाचव्या महाराष्ट्र वित्त आयोगाच्या अहवालाच्या अंमलबजावणीचा कालावधी वाढविण्यात आला आहे. हा कालावधी आता १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत राहणार आहे. वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांना (महानगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समित्या) निधी वाटप आणि आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करण्यासाठी हा कालावधी वाढवण्यात आला आहे. या निर्णयामुळे महानगरपालिका आणि ग्रामीण स्थानिक संस्थांना अतिरिक्त वर्षभराचा वेळ मिळेल, ज्यामुळे विकासकामांना गती येईल आणि आर्थिक नियोजन अधिक सुसंगत होईल. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे स्थानिक स्वशासन संस्थांच्या आर्थिक क्षमतेवर सकारात्मक परिणाम होईल, असे वित्त विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

**जलसंपदा विभाग : हिंगोलीत दोन साठवण तलाव प्रकल्पांसाठी २१४ कोटींची तरतूद**

जलसंपदा विभागाने हिंगोली जिल्ह्यातील दोन महत्त्वपूर्ण साठवण तलाव प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. यापैकी डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा प्रकल्प हिंगोली जिल्ह्यातील शेती आणि पिण्याच्या पाण्याच्या गरजा भागवण्यासाठी उपयुक्त ठरेल. तसेच, सेनगाव तालुक्यातील सुकळी साठवण तलाव प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांच्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली आहे. या दोन्ही प्रकल्पांमुळे एकूण २१४ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी खर्च होईल, ज्यामुळे मराठवाडा भागातील पाणीटंचाईवर मात करण्यास मदत होईल.

या प्रकल्पांमुळे हिंगोली जिल्ह्यातील शेकडो हेक्टर जमीन ओतली जाईल, नवीन सिंचन सुविधा निर्माण होतील आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढेल. जलसंपदा विभागाने सांगितले की, हे प्रकल्प पर्यावरणपूरक तंत्रज्ञान वापरून राबवले जातील आणि स्थानिक रोजगार निर्मितीला चालना मिळेल. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त भागासाठी हे प्रकल्प वरदान ठरतील, असे जलसंपदा विभागाचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.


या मंत्रिमंडळ निर्णयांमुळे महाराष्ट्राच्या विविध क्षेत्रांना चालना मिळेल. सहकारी बँकिंगला मजबुती, न्याय व्यवस्थेची सुरक्षा, स्थानिक संस्थांचे वित्तीय सशक्तीकरण आणि जलसंपदा विकास हे सर्व राज्याच्या एकात्मिक विकास धोरणाचा भाग आहेत. मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने सांगितले की, या निर्णयांची सविस्तर माहिती लवकरच विभागीय पातळीवर प्रसिद्ध केली जाईल आणि अंमलबजावणीसाठी आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे जारी होणार आहेत. राजकीय विश्लेषकांच्या मते, हे निर्णय येणाऱ्या अर्थसंकल्पीय घोषणांसाठी आधारभूत ठरतील आणि राज्याच्या आर्थिक आरोग्याला बळकटी देणारे आहेत

## पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ साठी आरक्षण जाहीर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक - २०२५ साठी आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आज आरक्षण निश्चिती करण्यासाठी सोडतीचे आयोजन करण्यात आले. या सोडतीमध्ये वीस प्रभागातील अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांचे आरक्षण जाहीर करण्यात आले.

यावेळी अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त नानासाहेब कामठे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, सचिव अक्षय कदम, उपायुक्त वैभव विधाते, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, आरेखक नितीन हुद्दार, निवडणूक विभाग प्रमुख नामदेव पिचड, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर आदी




अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

प्रारूप आरक्षण, हरकती व सूचना मागविण्यासाठी विहीत नमुन्यात 17 नोव्हेंबर 2025 पर्यंत प्रसिध्द करण्यात येणार आहत.

तर प्रारूप आरक्षण व हरकती व सूचना मागविण्याची अंतिम तारीख 24 नोव्हेंबर 2025 असणार आहे. यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिक नाट्यगृहात उपस्थित होते.

## ट्रक मधील डिझेलची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: ट्रक मधील डिझेलची चोरी केल्याप्रकरणी अज्ञाता विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात नऊ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

राम राऊत यांनी 260 लिटर डिझेल ट्रक मध्ये भरले आणि त्यांनी वाहन पळस्पे फाटा जवळ पार्क केले असता त्या ठिकाणी त्यांना झोप लागली.

सकाळी चारच्या सुमारास डिझेल टॅंकमधील कुलूप तोडून त्यातून 260 लिटर डिझेलची चोरी करण्यात आली.

## कृतिका मॅडम यांच्या नियोजनातून मंत्रालय दौऱ्यात पत्रकारांना मौल्यवान मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख**

**मुंबई, (प्रतिनिधी):** दर्पणकार बाळकृष्ण शास्त्री जांभेकर पत्रकार संघ यांच्या वतीने आयोजित मंत्रालय दौऱ्यात सहभागी झालेल्या पत्रकारांना शासनाच्या विविध विभागांचे कामकाज, नियंत्रण प्रणाली, तसेच प्रेस आणि डिजिटल मिडियाशी संबंधित विभागांचे व्यवहार याबाबत सखोल माहिती मिळाली.

या दौऱ्याचे उत्कृष्ट नियोजन मा. कृतिका मॅडम यांनी केले होते. संपूर्ण दौऱ्यादरम्यान मंत्रालयातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी यांनी प्रत्यक्ष संवाद साधून पत्रकारांना त्यांच्या विभागातील कार्यपद्धती, माध्यमांवरील नियंत्रण, आणि पारदर्शकतेचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले.




या उपक्रमातून पत्रकारांना शासनव्यवस्थेच्या कार्यपद्धतीची प्रत्यक्ष अनुभूती मिळाली.

अनेक पत्रकारांनी आपले अनुभव मांडताना सांगितले की, "हा दौरा पत्रकारितेतील नवे दृष्टीकोन उघडणारा आणि व्यावहारिक माहिती देणारा ठरला."

दौऱ्याचे संपूर्ण यश आणि श्रेय मा. कृतिका मॅडम यांना दिले गेले. त्यांच्या प्रयत्नांमुळे हा दौरा घडू शकला आणि सर्व सहभागी पत्रकारांना ज्ञानवर्धक अनुभव घेण्याची संधी मिळाली.

पत्रकारांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, "पत्रकार होणे म्हणजे केवळ बातमी देणे नव्हे, तर समाजाचे प्रतिबिंब दाखवणे आहे.

चांगल्या कामांचे कौतुक करणे आणि चुकीच्या गोष्टींवर अंकुश ठेवणे ही आमची जबाबदारी आहे. समाजाचा आवाज बनणे ही काळाची गरज आहे."

या दौऱ्याने सहभागी पत्रकारांना आपली जबाबदारी अधिक संवेदनशीलतेने पार पाडण्याचे प्रेरणादायी मार्गदर्शन दिले.

# कामशेत येथे घडलेल्या अपघाताची उप मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदेंकडून तात्काळ दखल !

### अपघातग्रस्त सर्व वारकरी बांधवांचे निशुल्क उपचार होणार

**नेरुळ प्रतिनिधी**

जासई उरण येथील वारकरी दिंडीचे आळंदीच्या दिशेने प्रवासात कामशेत जवळ अपघात. दुर्दैवाने दिंडीकडून रस्ता ओलांडताना MH46BU4172 वाहणाने धडक दिल्याने प्रियांका दत्तात्रय तांडेल वय ५३ करळपाडा ता. उरण जि. रायगड यांचा जागी मृत्यू..

१० वारकरी जखमी असून त्यातील ३ रुग्णांना हेड एंज्युरी तर ५ रुग्णांना फूट एंज्युरी असून दोघांना फेस एंज्युरी आहे.

रुग्ण नावे -

दत्तात्रय घरत - ६५ - चिरनेर ता उरण

हिराबाई पाटील - ६५ - चिरल ता. उरण



कामिनी गांधी - २८ - चिरल ता. उरण

अपर्णा अनंत ठाकूर - ५० - जासई, उरण

नंदू अप्पा चोपडे - ५५ - नायगाव, मावळ

ज्ञानदेव निवृत्ती गाडे - ५५ - नानोली, मावळ

तान्हाजी पुनाजी हेमाडे - ४० - वडेश्वर, मावळ

प्रभाकर लक्ष्मण तांडेल ( मयताचे पती) - ६२ - करळपाडा ता. उरण

शारदा नितीन ठाकूर - ४५ - रा. चिरले ता. उरण

जंदाळा अशोक कुमार - ३० - अंधेरी - रिक्षा चालक

श्री.डॉ. विकेश मुथा, महावीर, श्री.केसर हॉस्पिटल यांनी सर्वोतोपरी रुग्णांना मदत केली. सकाळी ७. ३० ला स्वतः आम्ही देखील घटनास्थळी दाखल होऊन संपूर्ण परिस्थिती उप मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे साहेब यांना दिली. तात्काळ जिल्हाधिकारी पुणे व पोलीस अधीक्षक पुणे यांना कार्यवाही चे आदेश देण्यात आले. खासदार श्रीरंग बारणे अप्पा यांनी घटनास्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा करून ५ तासापेक्षा अधिक काळ सुरु असलेले आंदोलन स्थगित करुन वाहतूक पूर्ववत केली.

रुग्णालयात पोहचताक्षणी स्वतः उप मुख्यमंत्री ना.शिंदे साहेबांनी व्हिडिओ कॉल द्वारे सर्वांशी संवाद साधला. या अपघातातील शेवटचा वारकरी पूर्ण बरा होईपर्यंत संपूर्ण काळजी घेण्याकरता आम्ही कटिबद्ध आहोत.

अक्षयमहाराज भोसले प्रदेशाध्यक्ष, शिवसेना धर्मवीर आध्यात्मिक सेना अशी माहिती श्री दिलीप किसनराव आमले अध्यक्ष शिव वाहतूक सेना नवी मुंबई यांनी दिली

## सेलू नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज प्रक्रियेला थंड प्रतिसाद; दोन दिवसांत एकही अर्ज दाखल नाही

**दैनिक युवक आधार**
**सेलू प्रतिनिधी शिवाजी पवार**

नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातील राजकीय घडामोडींना वेग आला असला तरी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेला सुरुवातीपासूनच थंड प्रतिसाद मिळत आहे.

अर्ज दाखल करण्यास सुरुवात होऊन दोन दिवस उलटले असतानाही अद्याप एकाही उमेदवाराने अर्ज सादर केलेला नाही. निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार, पहिल्या (दि. 11 नोव्हेंबर 2025) आणि दुसऱ्या दिवशी (दि. 12 नोव्हेंबर 2025) अर्जांची संख्या 'शून्य' इतकीच राहिली आहे.

अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू असली तरी उमेदवारांच्या दृष्टीने अद्यापही 'प्रतीक्षा' सुरू असल्याचे चित्र आहे. शहरातील राजकीय वर्तुळांत विविध पक्षांमध्ये गाठीभेटी, उमेदवारीवर चर्चा आणि अंतर्गत रणनीती आखण्याचे सत्र सुरू असून, अधिकृत उमेदवार निश्चित झाल्यानंतरच अर्ज दाखल होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार,




अर्ज सादर करण्यासाठी अजून पुरेसा कालावधी उपलब्ध आहे. परंपरेनुसार अनेक उमेदवार शेवटच्या टप्प्यात अर्ज दाखल करतात, त्यामुळे पुढील काही दिवसांत उमेदवारी अर्जांची संख्या वाढण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, मतदार आणि स्थानिक कार्यकर्त्यांचे लक्ष आता पुढील काही दिवसांतील राजकीय हालचालींकडे लागले आहे.

अर्ज भरण्याची अंतिम मुदत जवळ येत असल्याने राजकारणाचा तापमानही वाढण्याची चिन्हे दिसत आहेत.

## दिल्लीतील लाल किल्ल्या समोर झालेल्या स्फोटामागे पाकिस्तानचा हात – केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (आनंद पवार)**

राजधानी दिल्लीतील ऐतिहासीक लालकिल्या समोर एका वाहनात झालेल्या स्फोटाची घटना अत्यंत विदारक आहे.या स्फोटाचा आम्ही रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तीव्र निषेध करतो. या स्फोटा मागे पाकिस्तानचाच हात आहे.त्यामुळे आंतकवादी राष्ट्र असणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवला पाहिजे अशी संतप्त प्रतिक्रिया रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केली.

दिल्लीतील लालकिल्ल्यासमोर वाहनात स्फोटकांचा झालेला स्फोट



अत्यंत भीषण आहे.त्यात अनेक निष्पाप नागरिक मृत्युमुखी पडले. अनेक जण जखमी झाले.जे नागरिक मृत्युमुखी पडले त्यांना रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आपण भावपुर्ण श्रध्दांजली वाहतो.त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात आपण सहभागी आहोत. जे जखमी झाले आहेत ते लवकर बरे व्हावे अशी मी मंगल कामना करतो असे ना.रामदास आठवले म्हणाले.या स्फोटाची सखोल चौकशी करण्याचे आदेश गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेले आहेत.या स्फोटामागे जे कोणी आतंकवादी आहेत.त्यांना लवकरात लवकर अटक करुन कठोरात कठोर शिक्षा करण्यात येईल असा आम्हाला विश्वास आहे.सतत आतंकवादी घटना घडविणाऱ्या

आतंकवादी हल्ले आतंकवादी स्फोट घडविणाऱ्या पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याची गरज असल्याचे मत ना.रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

या स्फोटात जे मृत्यमुखी पडलेत,जखमी झालेत त्यांना सरकारच्या वतीने निश्चित मदत देण्यात येईल.लाल किल्ल्यात झालेल्या स्फोटाचा बदला भारत निश्चित घेईल असे ना.रामदास आठवले म्हणाले.

## 2 डिसेंबर पासून झी5 आणि टीव्ही चॅनेल्सवर लाइव्ह पाहता येईल; 'झी' कडून डीपी वर्ल्ड आयएलटी20 सिझन 4 चे थेट प्रक्षेपण

**दैनिक युवक आधार**

**मुंबई, वार्ताहर** : भारतातील अग्रगण्य कंटेंट आणि टेक्नॉलॉजी पॉवरहाउस झी इंटरटेन्मेंट एन्टरप्राइजेस लिमिटेड (झी) ने डीपी वर्ल्ड इंटरनॅशनल लीड टी20 (ILT20) सिझन 4 च्या थेट प्रक्षेपणाची घोषणा केली आहे. स्पर्धेची सुरुवात मंगळवार, 2 डिसेंबर 2025 रोजी होणार असून, भव्य अंतिम सामना रविवार, 4 जानेवारी 2026 रोजी खेळवला जाईल. पहिल्या तीन सिझनच्या उत्तुंग यशानंतर, ज्यामुळे ही लीग जगातील दुसरी सर्वाधिक पाहिली जाणारी टी-20 क्रिकेट लीग ठरली आहे, डीपी वर्ल्ड आयएलटी20 ने आपली जागतिक लोकप्रियता अधिक मजबूत केली आहे. क्रिकेटप्रेमी आणि क्रीडा चाहत्यांना आता भारतात आणि जगभरात थेट सामने पाहण्याची खास संधी मिळणार आहे. भारतातील प्रेक्षकांसाठी आयएलटी20 चे लाइव्ह प्रसारण झी च्या सर्व चॅनेल्सवर तसेच OTT प्लॅटफॉर्म Zee 5 वरही सामने पाहता येतील. याशिवाय,




जगभरातील प्रेक्षकांसाठी झीच्या सिन्डिकेशन पार्टनर्सच्या टीव्ही आणि डिजिटल नेटवर्क्सद्वारे थेट प्रसारण उपलब्ध राहील.

एकूण 34 सामन्यांची ही स्पर्धा यूएईतील तीन प्रतिष्ठित क्रिकेट स्टेडियममध्ये - दुबई, अबू धाबी आणि शारजाह येथे खेळवली जाणार आहे. स्पर्धेची सुरुवात मंगळवार, 2 डिसेंबर 2025 रोजी होईल, तर ग्रँड फायनल रविवार, 4 जानेवारी 2026 रोजी होईल. चाहत्यांना 'Z'च्या सर्वाधिक लोकप्रिय आणि व्यापक पसरलेल्या टीव्ही चॅनेल्सवर थेट प्रक्षेपणाचा आनंद घेता येईल. लीगचे 6 फ्रँचायझी संघ आहेत एमआय अमिरात,अबू धाबी नाइट रायडर्स, दुबई कॅपिटल्स, गल्फ जायंट्स, डिझर्ट वायपर्स आणि शारजाह वॉरियर्स. भारतीय अनुभवी खेळाडू दिनेश कार्तिक, पीयूष चावला आणि उन्मुक्त चंद या सिझनमध्ये मैदानात दिसणार आहेत. त्यांच्या सहभागामुळे जगातील सर्वाधिक लोकप्रिय आणि वेगाने वाढणाऱ्या या टी20 लीगमध्ये मजबूत भारतीय प्रतिनिधित्व दिसून येईल.

या सिझनमध्ये जगातील अनेक प्रसिद्ध क्रिकेटपटूंचा सहभाग उत्साह आणखी वाढवतो आहे. आंद्रे रसेल, किरॉन पोलार्ड, सुनील नरीन, निकोलस पूरन, टीम डेव्हिड, सॅम कुरन, आदिल रशीद, शिमरॉन हेटमायर, रोव्हमन पॉवेल, गुलबदिन नाईब, मोहम्मद नबी आणि शाकिब अल हसन यांसारखे स्टार खेळाडू या सिझनमध्ये मैदानात उतरणार आहेत, ज्यामुळे हा सिझन खऱ्या अर्थाने जागतिक दर्जाच्या क्रिकेट प्रतिभेचं प्रदर्शन ठरणार आहे.लक्ष्मी शेट्टी, हेड- ॲडव्हर्टायझमेंट रेव्हेन्यू, ब्रॉडकास्ट आणि डिजिटल, झी इंटरटेन्मनेंट एंटरप्राइजेश लि. म्हणाल्या,''झी'मध्ये आम्ही डीपी वर्ल्ड आयएलटी 20 चा चौथा सिझन प्रेक्षकांपर्यंत आणताना अत्यंत आनंदी आहोत. यंदा आम्ही क्रिकेट चाहत्यांना आमच्या नेटवर्कवर आणखी समृद्ध, आकर्षक आणि इन्क्लुझिव्ह व्ह्यूइंग एक्स्पिरियन्स देणार आहोत. जगातील सर्वोत्तम खेळाडू, प्रतिष्ठित स्टेडियम्स, उत्कृष्ट सुविधा आणि सहा मजबूत फ्रँचायझी संघांसह, आमचे उद्दिष्ट मागील वर्षाच्या यशावर आणखी भर घालणे व या लीगला जगातील सर्वाधिक पाहिल्या जाणाऱ्या क्रिकेट स्पर्धांपैकी एक म्हणून अधिक भक्कमपणे उभे करणे आहे. प्रत्येक सिझनसोबत लीगची लोकप्रियता वाढली आहे आणि यंदा आमचा फोकस चाहत्यांशी अधिक जोडणी निर्माण करणे, त्यांना या रोमांचक, भावनिक आणि दमदार क्रिकेट अनुभवाच्या केंद्रस्थानी आणणे असा आहे. या नवीन सिझनच्या सुरुवातीस आम्ही कटिबद्ध आहोत की, ही जागतिक लीग जगभरातील प्रेक्षकांसाठी अधिक सुलभ आणि उपलब्ध करून द्यावी."

# नांदेडमध्ये कॉंग्रेस - वंचित बहुजन आघाडी एकत्र

## "सम-समान-सन्मान"च्या तत्त्वावर ऐतिहासिक आघाडीची घोषणा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी -प्रकाश गवारे**

**नांदेड :** नांदेड जिल्ह्यातील १३ नगरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकांसाठी कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांनी आज संयुक्त आघाडी जाहीर केली. खासदार रविंद्र चव्हाण आणि वंचित बहुजन आघाडीचे राज्य उपाध्यक्ष फारुक अहमद यांनी संयुक्त पत्रकार परिषद घेऊन ही घोषणा करत राजकीय वर्तुळात चळवळ निर्माण केली.

या वेळी दोन्ही पक्षांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक न्याय, जनहित आणि लोकशाही मूल्यांचे



रक्षण हे दोन्ही पक्षांचे समान ध्येय असून "सम-समान-सन्मान" या तत्त्वावर आघाडी उभारण्यात आली असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले.

आघाडी संदर्भातील जागावाटप व रणनीतीवर झालेल्या चर्चेचे मार्गदर्शन मा. बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. राज्य समितीमार्फत जिल्हा स्तरावर झालेल्या वाटाघाटींनंतर १३ही नगरपालिका व नगरपरिषदेतील निवडणुकांमध्ये कॉंग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी संयुक्तपणे लढणार असल्याची माहिती देण्यात आली. पुढील निवडणुकांसाठीही परस्पर चर्चा करून निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले.

पत्रकार परिषदेत ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर विशेष चर्चा झाली.

वंचित आघाडीने ठाम भूमिका मांडताना सांगितले की, "२ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयावर न्यायालयीन निकाल येईपर्यंत ओबीसींच्या राखीव जागा जुन्या ओबीसींनाच द्याव्यात." ही भूमिका राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनीही समर्थन केल्याने अधिक बळ मिळाल्याचे नमूद करण्यात आले.

दोन्ही पक्षांच्या या भूमिकेमुळे नांदेड जिल्ह्यातील राजकारणात नवीन समीकरण निर्माण झाले असून, स्थानिक स्तरावर राजकीय वातावरणाला वेग आला आहे.

प्रमुख मुद्दे :

"सम-समान-सन्मान"च्या तत्त्वावर आघाडी

१३ नगरपालिका व नगरपरीषदांत संयुक्त लढत

बाळासाहेब आंबेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जागावाटप व रणनीती

ओबीसींच्या हक्कांसाठी दोन्ही पक्षांची ठाम भूमिका – शरद पवारांचा दुजोरा

एकत्रित अधिकृत प्रेसनोट लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

# मा.आमदार यशवंत माने यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य शिबीर संप्पन्न

## 28 मोतीबिंदू रुग्ण ऑपरेशन साठी घेऊन जाण्यात आले

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील शेळगाव येथील मोहोळ तालुक्याचे माजी आमदार यांच्या वाढदिवसानिमित्त इंदापूर तालुक्यात ठिकठिकाणी विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती ऍड अरविंद व्होरकाटे यांनी देण्यात आली याआरोग्य शिबिराचे उदघाटन श्री.तानाजी (बापू) थोरात श्री. हनुमंत (माने) गुरुजी श्री.आदित्यसिंह घोलप यांच्या हस्ते दि.11/11/ 2025 रोजी करण्यात आले मा श्री यशवंत तात्या माने युवा मंच व प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर यांच्या संयुक्त विद्यमानाने पद्मश्री डॉ. मनोहर डोळे मेडिकल फाउंडेशन यांच्या सहकार्याने एकुण 270 महिला पुरुष यांचे डोळे तपासणी करण्यात आले.

मुख्यमंत्री समृद्धी ग्रामपंचायत अभियान अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र सणसर येथे 218 महिला यांचे आरोग्य तपासणी हिमोग्लोबिन तपासणी बीपी शुगर तपासणी करण्यात आले व एकल महिला यांचे शिबिर आयोजित करण्यात आले होते

यावेळी 73 एकल महिलांचे आरोग्य तपासणी करण्यात आले सर्व महिला यांचे तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्राचे अधिकारी डॉ.युवराज पोळ यांच्या



मार्फत तपासणी करण्यात आले यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्रांचे वैद्यकीय अधिकारी डॉ पंकज पाटील आरोग्य सहाय्यक श्री अशोक कमळे आरोग्य सहाय्यक श्री ईशा सोलापूर आरोग्य सहाय्यिका श्रीमती ललिता मदने व सर्व आरोग्य सेवक सेविका व सर्व आरोग्य अधिकारी व आरोग्य कर्मचारी व आशा वर्कर ताई उपस्थित होते

हे आरोग्य शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी यशवंत (तात्या) युवा विचार मंच इंदापुर तालुक्यातील ॲड.अरविंद व्होरकाटे (पाटील) आकाश आवळे मनोज रसाळ अविनाश वरकड निलेश वाघमोडे तेजस रसाळ प्रितेश व्होरकाटे यांनी अथक प्रयत्न केले असल्याची माहिती देण्यात आली.

# स्वप्नपुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेला "विशेष बाब" म्हणून नोंदणीची परवानगी मिळणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी) :**

खारघर येथील स्वप्नपुर्ती गृहनिर्माण संकुलातील स्वप्नपुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्था क्र. ९ (नियोजीत) या संस्थेला "विशेष बाब" म्हणून नोंदणी करण्यास परवानगी देण्याबाबतच्या प्रस्तावाबाबत आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकारातून राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्यासोबत आज मंत्रालयात बैठक झाली. त्यानुसार गृहनिर्माण संकुलाच्या नोंदणी संदर्भातील शासन स्तरावरील तांत्रिक अडचणी दूर करून या संस्थेच्या नोंदणीचा मार्ग मोकळा केला जाणार असल्याचे मंत्री महोदयांनी आश्वासित केले. आणि त्यासाठी खास बाब म्हणून मंत्री महोदयांनी शिफारस केली आहे, त्यामुळे येथील रहिवाशांना मोठा दिलासा




मिळाला आहे.

स्वप्नपुर्ती गृहनिर्माण संकुल स्थापन करण्यासाठी सिडकोकडून दि. १६ जुलै २०२४ रोजी "ना हरकत प्रमाणपत्र" देण्यात आले होते. त्यानुसार संस्थेच्या मुख्य प्रवर्तकांनी मा. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (सिडको), बेलापूर यांचेकडे दि. १४ ऑगस्ट २०२४ रोजी नोंदणी प्रस्ताव सादर केला होता.तथापि, सहाय्यक निबंधकांनी त्यांच्या दि. ३ ऑक्टोबर २०२४ च्या पत्रान्वये, एकूण सदनिकांपैकी ५१ टक्के खरेदीदार सदस्य नसल्यामुळे नोंदणी करता येणार नसल्याचे कळविले होते. त्यानंतर महाव्यवस्थापक गृहनिर्माण सिडको यांनी दि.२३ जानेवारी २०२५ रोजी सिडकोचे सहाय्यक निबधंक यांना ५१ टक्के आवश्यक सदनिका साठी उर्वरीत विकी न झालेल्या सदनिकांची मालकी सध्यस्थितीत सिडकोकडे असल्याने व या सदनिकांसाठी सिडकोचे 'नाहरकत' गृहीत धरून एक विशेष बाब म्हणून संस्थेची नोंदणी करण्याबाबत कळविले होते. मात्र त्याची ठोस कार्यवाही न झाल्याने सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांना आमदार प्रशांत ठाकूर यांनी निवेदन देऊन या संदभात योग्य मार्ग काढण्यासाठी बैठकीची मागणी केली होती . त्या अनुषंगाने मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर यांच्या समवेत पनवेल-सिडको सहकारी गृहनिर्माण संस्था संघ मर्यादितचे अध्यक्ष कुंडलिक काटकर, स्वप्नपुर्ती सहकारी गृहनिर्माण संस्थेचे मुख्य प्रवर्तक अशोक जाधव, तसेच सिडकोचे जॉईंट रजिस्टार श्री. वीर, सहाय्यक निबंधक शंकर पाटील आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच या महत्वपूर्ण बैठकीत गृहसंकुल व रहिवाशांच्या प्रश्नावर सखोल चर्चा झाली असून लवकरच या संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याचे मंत्री महोदयांनी आश्वस्त केले.

# आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नामुळे पाटोद्यात होतंय श्री स्वामी समर्थांचे मंदिर

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

: पाटोदा शहरातील स्वामी समर्थ भक्तांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. पाटोदा शहरातील क्रांतीनगर लाल हनुमान मंदिर परिसरात ५० बाय ४० फुट जागेत श्री स्वामी समर्थ मंदिराचे काम वेगाने सुरू आहे. दोन महिन्यांत स्लॅबचे काम पूर्ण झाले आहे. हे काम देशमुख कुटुंबीयांनी दिलेल्या जागेत सुरू झाले. आमदार सुरेश धस आणि सौ.प्राजक्ताताई धस यांच्या पाठपुराव्यांमुळे २५ लाखांचा निधी मंजूर झाला. काही दिवसांपूर्वी प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली.शनिवारी दिनांक ८/११/२०२५ रोजी कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी मंदिराच्या कामाची पाहणी केली. त्यांनी कामाच्या दर्जाबाबत समाधान



व्यक्त केले व निधी उपलब्ध करून दिल्या बद्दल आमदार सुरेश धस यांचे आभार मानले. या वेळी त्यांनी आमदार धस यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. धस यांनी मंदिरासाठी आणखी २५ लाखांचा निधी उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. स्वामी समर्थ केंद्र या पूर्वी संत नरहरी महाराज मंदिरात तात्पुरते चालवले जात होते. सेवेकऱ्यांनी मंदिरासाठी स्वतंत्र जागेची मागणी केली होती. त्या नंतर आमदार सुरेश धस यांच्या कडे मागणी केल्यानंतर त्यांनी शासनस्तरावर प्रयत्न करुन २५ लक्ष रुपये निधी मंजूर करून दिला. मंदिरासाठी स्वर्गीय प्रभाकर बंडू देशमुख आणि त्यांच्या कुटुंबीयांनी ५० फुट बाय ४० फुटची जागा मंदिराला दान दिली. त्या नंतर कामास सुरुवात झाली. श्री स्वामी समर्थ गुरु पीठाचे प्रमुख आण्णासाहेब मोरे माऊली यांचे चिरंजीव कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी शनिवारी अचानक पाटोदा शहरात भेट दिली आणि सेवेकऱ्यांच्या विनंतीवरून आबासाहेब मोरे यांनी मंदिराच्या कामाची पाहणी केली. मंदिराच्या दुसऱ्या मजल्यासाठी आणखी २५ लाखांचा निधी लवकरच उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कामासाठी २०१९ पासून सेवेकऱ्यांसह आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक सोमीनाथ कोल्हे यांनी पाठपुरावा केला होता. आता हे मंदिर पूर्णत्वाकडे जात असुन या मंदिराचे अगदी दर्जेदार काम गुत्तेदार तुकाराम येवले हे करत आहेत. येथे भव्य सभागृह, गर्भगृह आणि सर्व सोयी सुविधांसह आध्यात्मिक केंद्र उभारले जात आहे. हे केंद्र पाटोदेकरांसाठी मोठे अध्यात्मिक स्थान ठरणार असल्याचा विश्वास कृषिभूषण आबासाहेब मोरे यांनी व्यक्त केला. या वेळी नगराध्यक्ष राजु भैय्या जाधव, एल.आर.जाधव सर, सौ.आशाताई कोल्हे, संतोष दिक्षित, पंडित सह इतर महीला भगिनी व भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राज्य क्रिकेट संघात श्रेयस चव्हाणची निवड

**दैनिक युवक आधार**
**पिलीव प्रतिनिधी( रघुनाथ देवकर ):** सातवे तालुका पन्हाळा येथील व जिल्हा क्रिकेट असोसिएशनचा खेळाडू श्रेयस चव्हाण याची बीसीसीआयमार्फत घेतल्या जाणाऱ्या २३ वर्षांखालील स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा एकदिवसीय साखळी पद्धतीने ७ ते ११ नोव्हेंबर दरम्यान येथे होणार आहे. महाराष्ट्रासह बडोदा, उत्तराखंड,



बिहार, पंजाब, बंगाल, छत्तीसगड या राज्यांत ही स्पर्धा होणार आहे. महाराष्ट्राचा पहिला सामना छत्तीसगडसोबत ७ नोव्हेंबरला, तर दुसरा सामना बडोदा संघासोबत ११ ला होणार आहे. तिसरा सामना उत्तराखंडसोबत १३ नोव्हेंबरला आणि चौथा सामना बिहारसोबत १४ ला होणार आहे. पाचवा सामना पंजाब संघासोबत १७ नोव्हेंबरला, तर सहावा सामना बंगाल, तर सातवा सामना छत्तीसगडसोबत होणार आहे. श्रेयसची यापूर्वी २०१८-१९ मध्ये १६ वर्षांखालील महाराष्ट्र संघात निवड झाली होती, तर २०१९-२० मध्ये विनू मंकड महाराष्ट्र संघात निवड झाली होती. २०२२-२३, २०२४-२५ मध्ये २३ वर्षांखालील एकदिवसीय व चारदिवसीय राष्ट्रीय स्पर्धेतही महाराष्ट्र संघात निवड झाली. इंडियन प्रीमियर लीगमध्ये त्याच्याची सौदी अरेबिया (जेद्दाह) येथे झालेल्या मेगा लिलावात निवड झाली आहे. आयपीएलसाठी निवड झालेला तो पहिला कोल्हापूरकर ठरला आहे अशी माहिती पत्रकार संघाचे ज्येष्ठ पत्रकार सुनील पाटील यांनी दिली.

# हॉटेलच्या गल्ल्यातून 70 हजार रुपये चोरले

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

हॉटेलच्या दुकानाचे शटर उचकटून चोरट्याने गल्ल्यातील 70 हजार रुपये चोरून नेले. या प्रकरणी खांदेश्वर पोलिस ठाण्यात आठ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. लवेश सोनवणे यांचा प्रजापती आर्केड, सेक्टर 15, नवीन पनवेल येथे कॅफे लविस्ता हॉटेल आहे. आठ नोव्हेंबर रोजी त्यांचा कामगार हॉटेल उघडण्यासाठी आला असता त्याला शटर उचकटलेला दिसला. यावेळी सोनवणे यांनी हॉटेलमध्ये पाहिले असता गल्ल्यातील 70 हजार रुपये दिसून आले नाहीत.

# काँग्रेस पक्षाने वानोळा जिल्हा परिषद गटातून संधी दिल्यास संधी चे सोने करेल–कृष्णकुमार राठोड

**दैनिक युवक आधार**
**माहुर (प्रतिनिधी) सय्यद ईसा**

आगामी जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुक काँग्रेस पक्ष ताकदीने लढणार वाई बा. व वानोळा जि. प. गटात उमेदवारी मिळण्यासाठी अनेक जण इच्छुक असून भारतीय राष्ट्रिय काँग्रेस पक्षाची उमेवारी मिळविण्यासाठी प्रयत्न शील असल्याची माहिती वानोळा जि. प. गटात माजी जि.प. सदस्य स्व.दतरामजी राठोड यांचे सुपुत्र कृष्णकुमार राठोड यांनी दिली. हे इच्छुक असून चारही पं.स. गणात सुद्धा लढाऊ व अभ्यासू कार्यकर्त्यांना उमेदवारी काँग्रेस पक्ष



देणार असून वानोळा, गोंडवडसा व हडसनी गणात सुद्धा अनेक जण पक्षाकडे उमेदवारी मागत आहेत. गेल्या अनेक वर्षापासून माहूर तालुक्यातील सर्वसामान्य नागरिक कष्टकरी शेतमजूर व शेतकरी यांच्या विविध समस्या अडचणी सोडविण्यासाठी काँग्रेस पक्षाने केलेले कार्य देशाच्या सर्वोच्च सभागृहाचे विरोधीपक्षनेते खा. राहुल गांधी यांचा नफरत के बाजार मे मोहबत की दुकान चालविण्याचा कानमंत्र कट्टर काँग्रेसीनी आत्मसात केलेला आहे. आगामी जि. प.,प.स. सार्वत्रिक निवडणुकीत माहूर तालुक्यातील दोन्ही जि.प.गटातून आगामी निवडणुकीत तगडे उमेदवार उभे करण्यात येईल असे काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेशजी पावडे हे दिनांक 25 ऑक्टोंबर रोजी कपिलेश्वर धर्मशाळा येथे घेण्यात आलेल्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीमध्ये वानोळा जिल्हा परिषद गटातून कृष्णकुमार राठोड यांनी तिकीट ची मागणी केली आहे. पक्षाने उमेदवारी दिल्यास हमखास विजयश्री खेचून आणू असा विश्वास मुलाखती मधून जिल्हाध्यक्ष राजेश जी पावडे व पक्ष निरीक्षक बालाजी चव्हाण तसेच अल्पसंख्यांक आघाडीचे अजिज कुरेशी त्यांच्याकडे मागणी केली. कृष्णकुमार राठोड हे स्वर्गवासी दत्तरामजी जयराम राठोड माजी जिल्हा परिषद सदस्य होते. त्यांना शिक्षण महर्षी म्हणून त्यांची तालुक्यात ओळखल्या जात होते. स्वर्गीय माजी मुख्यमंत्री सुधाकरराव नाईक यांचे ते विश्वासू होते त्यांचाच वारसा पुढे नेण्याकरिता वानोळा जिल्हा परिषद गटातून काँग्रेस पक्षातर्फे प्रबळ दावेदार म्हणून पक्षाकडे मागणी केली.

# परतूर पालिका निवडणुकीसाठी विविध कक्षांची स्थापना

**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना (अशोक ठोके)**

परतूर नगरपरिषद निवडणुकीचे कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी विविध कक्षांची स्थापना करण्यात आल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी प्रणाली तायडे यांनी दिली.

यासंदर्भात अधिक माहिती देताना तायडे यांनी सांगितले की,परतूर नगरपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सोमवार दि. 10 नोव्हेंबरपासून सुरु झाली आहे.निवडणुकीचे कामकाज सुरळीत पार पडावे यासाठी विविध कक्षांची स्थापना करण्यात आली असून यामध्ये आचारसंहिता कक्ष, मनुष्यबळ व्यवस्थापन कक्ष,



इव्हीएम कक्ष, इव्हीम व इतर प्रशिक्षण कक्ष, परवाना अर्थात एक खिडकी कक्ष, मतपत्रिका कक्ष, टपाली मतदान कक्ष, वाहतूक व्यवस्थापन कक्ष,विविध साहित्य कक्ष, निवडणूक खर्च व संनियंत्रण कक्ष, मतमोजणी कक्ष व इतर कक्षांचा समावेश आहे.

# शेतकऱ्याच्या नशिबातील दुःखाच्या वाटा कधी संपणार

**दैनिक युवक आधार**
**तालूका प्रतिनिधी:महादेव उप्पे देगलूर वार्ताहर**

मागील काही दिवसात अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या बळीराजाला शिल्लक असलेल्या पिकांची विल्हेवाट लावण्यासाठी नाकीनऊ येत आहे तर काही शेतकऱ्याच्या शेतातील सोयाबीन काढणीसाठी मजूरांना एका बॅगेसाठी पाच पाच हजार रुपये मोजावे लागत आहे.

तरीसुद्धा अशा परिस्थितीमधून शेतकरी सावरत असताना जमा करून ठेवलेल्या गंजीलाच आग लागल्यामुळे शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे.

सविस्तर माहिती अशी की, देगलूर तालुक्यातील मौजे मानूर येथील शेतकरी गिण्यानबाई हावणप्पा कोळूरे रा.मानूर तालूका देगलूर येथील रहिवासी असून गट क्र.२८८ मधील आपल्या शेतातील सोयाबीन गोळा करून ठेवण्यात आले होते

परंतू दि.१० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी



साडे सहा वाजेच्या दरम्यान सोयाबीनच्या गंजीला आग लागून किमान तीस क्विंटल सोयाबीन जळून खाक झाले असल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असून शेतकऱ्याच्या वाट्यल्या येणारा दुःख कधी संपणार अशीच चर्चा सुरू आहे.

या घटनेची दखल घेत शासनाकडून त्वरीत पंचनामा करून न्याय मिळावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे व अशा या घटनेनंतर संपूर्ण परिसर हळहळ व्यक्त करीत आहे.

# उरण तालुक्यातील जासई- आळंदी वारकरी दिंडीला कामशेत येथे अपघात

## चिरडून एका वारकऱ्याचा जागीच मृत्य

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जासई उरण ते आळंदी दिंडी ही7 नोव्हेंबर रोजी निघाली असताना दिनांक 11 रोजी या पायी चालणाऱ्या दिंडीत सव्वाशेच्या आसपास वारकरी सहभागी झाले होते .आणि आज सकाळी कामशेत येथून दिंडी आळंदी कडे निघली, रस्ता क्रॉस करत असताना भरवेगात एक कंटेनर दिंडीत घुसला असता हा भीषण अपघात घडला आहे .त्यात एका वारकऱ्याचाचिरडून जागीच मृत्यू झाला असून अनेकवारकरी जखमी झाले आहेत.

हाती आलेल्या वृत्तानुसार



एकूण आठ जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. ही दिंडी उरणहून आळंदीच्या वारीसाठी निघाली होती जखमी वारकऱ्यांवर महावीर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दैनिक

या भिषण अपघातात उरण तालुक्यातील करळ पाडा येथील "प्रभाकर तांडेल यांच्या पत्नी मंजुळा तांडेल" यांचाजगीच दुर्दैवी मृत्यू झाल्याचे वृत्त हाती आले आहे. संतप्त वारकऱ्यानी रस्ता रोखून धरला आहे.

# आम्ही जनतेची काम करतोय म्हणून जनता आणि प्रत्येक समाजघटक आम्हाला ८ - ८ लाखाच्या फरकाने निवडून देतात - अजित पवार

## भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी हाती बांधले घड्याळ ;अजितदादा पवार यांनी पक्षात केले स्वागत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** आम्ही सत्तेचा गैरवापर कधी केला नाही... आम्ही सत्तेचा गर्व कधी केला नाही...कारण सत्तेचा गैरवापर जास्त काळ टिकत नसतो. आम्ही जनतेची कामं करतोय म्हणून जनता आणि प्रत्येक समाजघटक आम्हाला ८ - ८ लाखाच्या फरकाने निवडून देतात. या जनतेमुळे आणि कार्यकर्त्यांमुळेच आम्ही निवडून येतो अशी स्पष्ट कबुली राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आज दिली.




आष्टी - पाटोदा - शिरुर मतदारसंघातील भाजपचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी आज आपल्या असंख्य पदाधिकाऱ्यांसह अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत जाहीर पक्षप्रवेश महिला विकास मंडळ सभागृह मुंबई येथे केला.

नुसतं राजकारण करुन आपलं पोट भरणार नाहीय हे लक्षात घ्या. ज्या - ज्या योजना केंद्र व राज्यसरकार आणत आहे त्याचा लाभ गरीब लोकांना करुन द्या. त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे वातावरण दिसले पाहिजे असे आवाहनही अजित पवार यांनी कार्यकर्त्यांना केले.

मी चांगल्याच्या पाठीमागे माझी संपूर्ण ताकद उभी करेन पण चुकीचं करून पदरात घ्या म्हणाल तर जमणार नाही. चूक करुन पदरात घ्या म्हणाल पण आता पदर पार फाटून गेला आहे. त्यामुळे आता तसं काही सांगू नका असा सबुरीचा सल्लाही अजित पवार यांनी दिला.

कोरोना आला त्यावेळी वैद्यकीय क्षेत्र किती महत्वाचे आहे हे समजले आणि त्यातून आम्ही पायाभूत सुविधा केंद्र व राज्यशासनाच्यावतीने उभ्या केल्या आहेत. प्रत्येक जिल्ह्यात मेडिकल कॉलेज उभारण्याचा निर्णय घेतला आहे एक हजार कोटी रुपये खर्चून अंबाजोगाईत मेडिकल कॉलेज उभारण्यात आले आहे. आता पालघर, जालना, वाशिमलादेखील मेडिकल कॉलेज देणार आहे. कॅन्सर हॉस्पिटल काढण्यासाठी भीमराज धोंडे आपण सूचना केली आहे. माझ्या कार्यालयातील ढाकणे व भोसले यांना याठिकाणी लक्ष घालण्यास सांगितले आहे. सीएसआरच्या माध्यमातून या हॉस्पिटलला सहकार्य करु असे आश्वासनही अजित पवार यांनी दिले.

कृत्रिम पध्दत वापरून शेती करण्याचा प्रयत्न आता शेतकऱ्यांनी करायला हवे. 'एआय' हे माध्यम इतके प्रभावशाली ठरत आहे की नवीन टेक्नॉलॉजीने आज जग इतकं जवळ आले आहे. की कुठेही काही घडलं तर क्षणात आपल्याला माहिती मिळत आहे. 'एआय' चा वापर करून कशापध्दतीने शेती करता येते याची माहितीही अजित पवार यांनी यावेळी दिली.

आज आष्टी - पाटोदा - शिरुर मतदारसंघातील जे पदाधिकारी प्रवेश करत आहेत त्यांना बळ देण्याचे काम केले जाईल. त्यांचा मान - सन्मान राखला जाईल असे सांगतानाच त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मनापासून स्वागत केले आणि राष्ट्रवादी काँग्रेस नेहमीच सर्व घटकांच्या पाठीशी उभा राहिला आहे आणि यापुढेही राहिल असे आश्वासन अजित पवार यांनी दिले.

यावेळी जळगाव आणि वाशिम जिल्ह्यातील विविध पक्षातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये जाहीर प्रवेश केला.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, माजी मंत्री धनंजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, आमदार विजयसिंह पंडित, माजी आमदार बाळासाहेब आजबे, प्रदेश सरचिटणीस सुरज चव्हाण, बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे,चंद्रकांत ठाकरे, युवती प्रदेशाध्यक्षा संध्या सोनवणे आदींसह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

---

# शिवसेनेच्या भगवा सप्ताहात घरोघरी जाऊन शासकीय योजनांचा जनतेला लाभ देणारे समाजसेवक मा. शिवाजीराव थोरवे

## शिवसेना भगवा सप्ताहात थोरवे यांची उल्लेखनीय कामगिरी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :**पनवेल तालुक्यातील खांदा कॉलनी परिसरातील जनतेचा विश्वास संपादन करून, नागरिकांच्या सुख-दुःखात नेहमीच तत्परतेने धाव घेणारे समाजसेवक व माजी नगरसेवक मा. शिवाजीराव थोरवे हे आज जनमाणसाचे खरे आधारस्तंभ ठरले आहेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे त्यांचे कार्य उल्लेखनीय असून,सामाजिक व धार्मिक क्षेत्रात त्यांनी घडवलेले उपक्रम प्रशंसनीय ठरले आहेत.

शिवसेनेचा भगवा सप्ताह-जनसेवेसाठी उपक्रम:शिवसेना खांदा कॉलनी (प्रभाग क्र. १५) तर्फे दिनांक १९ जून ते १९ जुलै २०२५ या कालावधीत "भगवा सप्ताह" जनसेवेचा उपक्रम म्हणून साजरा करण्यात आला. या काळात शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी नागरिकांच्या दारापर्यंत शासनाच्या विविध योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी समर्पितपणे कार्य केले.

या अभियानात मा. शिवाजीराव थोरवे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३२ शासकीय योजना आणि सेवा उपक्रम राबविण्यात आले.

भगवा सप्ताहातील जनकल्याणकारी उपक्रम,अपंग,विधवा महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी लाभ योजनांचे अर्ज व



फॉर्म भरणे,आयुष्यमान भारत, लाडकी बहीण,आभा कार्ड, रेशन कार्ड,मतदार ओळखपत्र वाटप, शालेय विद्यार्थ्यांसाठी दाखले वाटप व गुणगौरव सोहळा,ई-श्रम कार्ड,कृषी कार्ड, पेन्शन योजना फॉर्म,मुख्यमंत्री राहता निधी योजना फॉर्म भरून देणे,मोफत नेत्र मोतीबिंदू शस्त्रक्रिया व आरोग्य तपासणी शिबिर महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना अंतर्गत मोफत उपचार व शस्त्रक्रियांची माहिती,७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी एस.टी./एन.एम.टी.पास मिळविण्यास मदत,आर.टी.ओ. नियमानुसार एच.एन.आर.पी. नंबर प्लेट ऑनलाईन सुविधा,आधारकार्ड, पॅनकार्ड,पासपोर्ट सेवा व ई-धम कार्ड ऑनलाईन नोंदणी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व इतर शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविणे,आर्मी निवृत्त सैनिक, निवृत्त पोलीस,शिक्षक,बेस्ट व एन.एम.एम.टी.कर्मचारी यांचा सत्कार,गरजू विद्यार्थ्यांना वह्या, शैक्षणिक साहित्य व चहा-नाश्ता वाटप,वारकरी सांप्रदायिक प्रसारक मंडळ दिंडी सोहळा आयोजन,

सोसायट्यांमध्ये जाऊन नागरिकांना शासनाच्या योजनांची माहिती देणे,

शिवसेना पक्ष सभासद नोंदणी मोहीम व मतदार नोंदणी ऑनलाईन फॉर्म भरणे,खांदा कॉलनी शिवसेना मेळावा आयोजित करून नागरिकांशी थेट संवाद साधला गेला.

**थोरवे यांचे जनतेशी घट्ट नाते :** खांदा कॉलनी परिसरातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होणारे मा. शिवाजीराव थोरवे यांनी सामाजिक,धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रात अनेक उपक्रम राबवून खऱ्या अर्थाने जनतेचे सेवक म्हणून स्थान निर्माण केले आहे.

त्यांच्या पुढाकारामुळे अनेक नागरिकांना शासनाच्या योजनांचा थेट लाभ मिळाला असून समाजात सेवा आणि सन्मान या मूल्यांना बळ मिळाले आहे.

**जनतेची एकमुखी भावना खांदा कॉलनीतील नागरिकांनी व्यक्त केलेल्या भावना :** "शिवसेनेचा भगवा सप्ताह म्हणजे खऱ्या अर्थाने जनतेचा सेवा सप्ताह!

आमच्यासाठी दिवस-रात्र झटणारे समाजसेवक मा. शिवाजीराव थोरवे हेच आमचे खरे जननायक आहेत.

अशा जनतेसाठी झटणाऱ्या सेवाभावी व्यक्तिमत्त्वाला मागील काळात नगरपरिषदे नगरसेवक म्हणून काम केल्याचा अनुभव पाठीशी आहे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत महापालिकेत नगरसेवक संधी मिळाली तर जनतेच्या विविध समस्या मार्गी लावण्यासाठी त्यांना ताकद मिळेल "

**जनतेचा विश्वास – शिवसेनेचा भगवा :**"शिवसेना म्हणजे सेवा" या तत्त्वावर कार्य करत, नागरिकांच्या हितासाठी सातत्याने प्रयत्नशील राहणारे

मा.शिवाजीराव थोरवे हे आज खांदा कॉलनीतील प्रत्येक नागरिकाच्या मनात कायमस्वरूपी स्थान मिळवून बसले आहेत.

भगवा सप्ताहाच्या माध्यमातून त्यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले, "जनतेची सेवा हाच खरा धर्म, आणि समाजसेवा हीच खरी राजकारणाची दिशा."

सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याच्या अनुषंगाने दैनिक युवक आधार च्या वर्धापन दिनी न्यूज १८ लोकमतचे जेष्ठ अँकर मा.विलास बडे व सकाळ माध्यम समूहाचे मुख्य संपादक व साम टीव्हीचे सी ओ ओ मा.निलेश खरे यांच्या हस्ते *समाजसेवक शिवाजीराव थोरवे यांना समाजभूषण पुरस्कार* देऊन सन्मान करण्यात आला

---

# फर्दापूर सार्वजनिक बांधकाम उपविभागातील अभियंता नितीन राठोड यांना "महाराष्ट्र भूषण पुरस्कार "



त्यांच्या प्रकल्पांमधील सौंदर्य, गुणवत्ता आणि आधुनिकतेचा स्पर्श हेच त्यांच्या कार्याचं वैशिष्ट्य आहे.या पुरस्कारामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्हा आणि बंजारा समाजाचा अभिमान उंचावला आहे.राठोड यांनी आपल्या मेहनती, दृष्टीकोन आणि नावीन्यपूर्ण विचारांनी राज्यभर नवी ओळख निर्माण केली आहे. त्यांची वाटचाल आजच्या तरुण अभियंत्यांसाठी प्रेरणादायी ठरली असून,"थ्री-डी डिझाईन" या क्षेत्रात त्यांनी महाराष्ट्रात नवीन दिशा आणि नवा दर्जा दिला आहे.

अजयजी टाकसाळः- उप अभियंता फर्दापूर

"महाराष्ट्र भूषण" पुरस्कारासाठी करण्यात आली आहे.थ्री-डी डिझाईनचा शिल्पकार नितीन राठोड यांनी डिझाईन क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून घराच्या आराखड्याला "जीवंत रूप" दिलं आहे.त्यांची कामं म्हणजे डिझाईन आणि भावना यांचं परिपूर्ण मिश्रण!त्यांच्या कल्पकतेने ग्रामीण भागातही आधुनिक गृह डिझाईनची नवी क्रांती घडवून आणली आहे.

सुभाष जगन्नाथ सोनवणे ( कनिष्ठ अभियंता फर्दापूर)

"डिझाईन म्हणजे फक्त आराखडा नाही, ती माणसाच्या स्वप्नांची बांधणी आहे!"

— नितीन राठोड

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव वार्ताहर :** सोयगाव तालुक्यातील फरदापुर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांनी थ्री-डी डिझाईनच्या विश्वात कल्पकतेला आकार देणारे, डिझाईनचं स्वप्न साकार करणारे नाव म्हणजे नितीन गुलाबराव राठोड! बांधकाम क्षेत्रात आधुनिकता आणि सृजनशीलतेचा संगम घडवून आणणाऱ्या या तरुण अभियंत्याला प्रतिष्ठेचा "महाराष्ट्र भूषण पुरस्कार २०२५" जाहीर झाला असून,

**त्यामुळे संपूर्ण छत्रपती संभाजीनगर जिल्हा अभिमानाने डोळे भरून पाहतो आहे! पुण्यात होणार गौरव सोहळा**

युवा महाराष्ट्र फाउंडेशन तर्फे आयोजित राज्यस्तरीय "कर्तुत्ववान व्यक्ती सन्मान सोहळा" हा दिमाखदार कार्यक्रम बुधवार, दि.१० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ ते ३ वा.पं. जवाहरलाल नेहरू सभागृह,घोले रोड,शिवाजीनगर, पुणे येथे पार पडणार आहे. या सोहळ्यात राज्यभरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा गौरव होणार असून,थ्री-डी डिझाईन क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कार्यासाठी फर्दापूर सार्वजनिक बांधकाम उपविभागात कार्यरत नितीन राठोड यांची निवड.

---

# अशियाना कॉर्नर सोसायटी मधील नागरिकांच्या आरोग्यास धोका

## निकाम्या सांडपाणी टाकीच्या गळतीने रोगराईचा गंभीर प्रश्न उपस्थित

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : (खोपोली) :** विना नगर येथील अशियाना कॉर्नर या सोसायटीच्या परिसरा बाजू लगत असलेल्या सोसायटीच्या सांडपाणी टाकीच्या गळती मोठ्या प्रमाणात होत असल्याने त्यामुळे ते घाण पाणी एका ठिकाणी साचून मच्छर ,माशांचे प्रमाण वाढत आहे . त्या परिसरात दुर्गंधी पसरत असल्याने येथील नागरिकांच्या आरोग्यास मोठा धोका निर्माण होत असल्याची चिंता हि परिसरातील नागरिक व्यक्त करत आहे. आशियाना कॉर्नर व तेथील जवळील स्थानिक सदनिकाधारक या अडचणी मुळे अनेक दिवस त्रस्त असून यावर योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करत आहे .या गंभीर विषयी कोणा कडून हि नियोजन होत नसल्याने आसपासच्या गृह संकुलना मधील नागरिकांच्या मध्ये यामुळे वाद ,विवाद निर्माण होत कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता हि वर्तवली जात आहे .या प्रभागात नगरपालिकेच्या वतीने साफसफाई व आरोग्य विभागाचे गांभीर्याने लक्ष नसून उघड्यावर साचलेल्या




सांडपाणी नियोजन प्रक्रियेवर नियमितपणे उपाययोजना होत नसल्याचे या निमित्ताने स्पष्टपणे दिसत आहे . आपल्या कर्तव्यात कसूर करत असलेल्या स्वच्छता अभियानाच्या देश कार्यात अपेक्षित सहभाग किंवा सामजिक हित जवाबदारी पाळत नसलेल्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

शहरातील निवासी क्षेत्रातील संकुलन रहिवासी सदस्य व पर्यावरण अभ्यासक यांनी सदनिका सोसायटी यामधील सांडपाणी निचरा करणाऱ्या टाक्यांची वार्षिक तपासणी व्हावी व आरोग्य व सुरक्षेच्या दृष्टिकोनातून त्याचा अहवाल नगरपालिकेने मागवावे व त्या अहवाला नुसार सांडपाणी नियोजन व सेफ्टी टॅंक याबद्दल सुरक्षित धोरण,सूचना,दंड निश्चित करण्यात यावे अशी मार्गदर्शक सूचना या निमित्ताने व्यक्त केली.

नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण न व्हावा यासाठी नियोजनबद्ध महत्त्वपूर्ण अशा उपाययोजना पालिकेच्यावतीने करणे महत्त्वपूर्ण असल्याने करदाते ,सुज्ञ नागरिक भविष्यातील अश्या गृह संकुलनाच्या अडचणींवर कश्या प्रकारे लक्ष देतील याकडे अपेक्षेने पाहत आहे. तक्रारी, निवेदन अर्जानंतर हि यावर मार्ग निघत नसल्यास किंवा नियमबाह्य पध्दतीने असुरक्षित पणे जाणीव पूर्वक धोका निर्माण करणाऱ्या पालिका प्रशासन ,गृहसंकुल सदस्य किंवा व्यक्ती विरोधात कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सुज्ञा नागरिकां कडून केली जात आहे.

---


# खोटे पणाला मर्यादा हवी............!

वर्तमानात खोटे पणाला फारच महत्त्व आलेले दिसुन येते. खोट्यालाही वेगळी चव असते. स्वतः बोलले तर गोड वाटते आणि दुसऱ्यांनी बोलले तर कडू लागते. खोट बोला पण रेटून बोला असे आजचे युग आहे. लोक काय म्हणतील याचा सुध्दा विचार करीत नाही. पण याचा विचार करणे आवश्यक नाही काय?* मनात खोट बोलण येतच कसं? जर आपण यात सकारात्मक दृष्टी कोणातुन विचार केला तर आणि मनातुन काढून टाकले तर जिवनात प्रत्येक गोष्ट शक्य आहे. असे म्हणणे रास्त ठरावे. खोट बोलल्याने आपण पुढच्या पिढीला/व्यक्तीला किंवा परिस्थितीला/ परिस्थितीची फसवणुक करीत आहे. असे नाही वाटत काय? याचे परिणाम काय होतील याचा सारासार विचार करणे अगत्याचे आहे. जर आपण नेहमी खोट्याला प्राधान्य दिले तर मनात खोट्या बाजार निर्माण होवुन मन नेहमी खोट संग्रह करतो व आपल्या स्वतःच्या मनावर ताबा मिळवतो. याचा अनुभव स्वतःलाच काही दिवसानी पहायला मिळतो. ''आहे ते जपता आलं की, पाहिजे ते मिळविता येते हे सत्य नाकारून चालणार नाही.

सुख व दुःख आपल्या कर्मानुसार मिळत असते याचा गरीब आणि श्रीमंता ची काही संबंध नसतो. .....'' रडणारा महालात ही रडतो आणि हसणारा झोपडीत ही हसतो......! म्हणुन की काय खोटं बोलण हे कीतपट बरोबर आहे. परमात्मा कधीच कोणाच भाग्य लिहीत नाही. भाग्य लिहतात ते आपले विचार, व्यवहार आणि चांगले कर्म यामुळेच आपण या भुथलावर जिवन प्रवास करीत आहोत. खोटे बोलणे सोपे वाटू शकते परंतु दिर्घ काळात ते अधिकच क्लिष्ट असे शकते. म्हणुनच सत्यावर नेहमी प्रेम करा. खोटे पणामुळे नातं नष्ट होवु देवु नका. खोटेपणा माणसाला फक्त तात्पुरता सुख देतो पण, विश्वास कायम टिकुन राहत नाही. याचा विचार जिवन जगतांना करणे गरजेचे नाही काय? या गोष्टीचा सकारात्मक विचार केल गेला तर त्याचे परिणाम विश्वासाने आपल्याला दिसुन येतील तेव्हा स्वतःला आनंदच होईल त्यावेळेस स्वतःची उंची दैदिप्यमान होईल.

किंबहुना, सद्य परिस्थितीत आपले ई पी एस 95 पेन्शन धारक कसे हलाकीचे जीवन जगत आहे ते आपल्या सर्वांना माहित आहे. गेल्या 10 ते 15 वर्षापासुन पेंशन वाढीकरीता लढा सुरू आहे. वर्ष 2014 ला कोशीयारी समितीने रिपोर्ट या समवेत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल दि. 04/11/2022 तसेच 10 ते 15 पेन्शन वाढीबाबत विविध समितीचे रिपोर्ट पेंशन धारकांचे बाजुने असुन सुध्दा वर्तमान सरकार या गोष्टीकडे लक्ष देत नाही. याला आपण काय म्हणाल? सरकार नेहमी खोटे आश्वासन देवुन जेष्ठ पेंशन धारकांची फसवणुक करतो असे नाही वाटत काय. वर्तमानात सरकारने स्वतःकडून समितीला सकारात्मक पत्र देवुन सुध्दा पेंशन मध्ये वाढ न करणे याचा अर्थ काय समजावे? असे म्हणण्याची पाळी आम्हा पेन्शन धारकां वर का बरं यावी. वर्तमानात चांगले नावाजलेले पत्रकार सुध्दा U ट्यूब वर खोट्या बातम्या देत असतात. परिणामतः आम्ही सर्व ई पी एस पेंशन धारक दुःखीआहो. आता वर्तमान सरकारवर, नेत्यावर कवडी चाही विश्वास राहिलेला नाही. असे सामान्य पेन्शन धारकांना वाटते. या बाबतीत ई पी एफओ अधिकाऱ्यांशी चर्चा केली असता असे निर्दशनास आले आहे की, सर्व डाटा तयार आहे पण, आदेश सरकार कडून अपेक्षीत आहे. मात्र आम्हाला या लेखा व्दारे सांगणे आहे की, सर्व डाटा तयार असतांना सरकारची पेंशनवाढ देण्याची मानसिकतेची कुठे माशी शिंकली ? U ट्यूब वर सफशेल खोट्या बातम्या देणे कृपया बंद करावे अशी सार्थ विनंती मी भारत सरकारला व चॅनल वाल्यांना करीत आहोत. खोटेपणा फार जास्त दिवस टिकत नसते. एक दिवस त्याच भांड फुटल्या शिवाय राहणार नाही हे मात्र सत्य आहे. कोणत्याही गोष्टीला मर्यादा हवी अन्यथा हे जगणे पुर्णतः रूपाने नश्ट झाल्या शिवाय राहणार नाही. खोट्याचा फुगा तात्पुरता मोठा दिसतो पण फुटल्यावर काय परिस्थिती निर्माण होते हे आपल्याला भविष्यात दिसुन सर्वोच्च न्यायालयाचा अवमान आणि जेष्ठ पेंशन धारकांचा अपमान याचे परिणाम भविष्यात होतीलच कारण खोट्याची चव जास्त दिवस टिकत नाही. पेंशन वाढीसाठी देशात ज्या ज्या समित्या प्रयत्नशील आहे त्यांना अखेरपर्यंत यश हे मिळेलच. तेव्हा सरकारची म्हणुन वर्तमानात सकारात्मकतेने विचार करण्याची गरज आहे. खोटे पणाचा पूर जास्त दिवस टिकत नसतो. तो एक दिवस ओसरनार आहे. सत्याच्या मार्गावर/लोकांच्या कामावर ( पेंशन वाढीचा) भर झाला तर योग्य दिशेने तुमची आमची प्रगती होईल अन्यथा वर्तमानात असलेले नेत्यांचे चांगले दिवस भविष्यात घसरणीवर आल्याशिवाय राहणार नाही हे सत्य नाकारू शकत नाही.

जाता जाता ............ सत्याच्या मार्गाने चांगले गुण आत्मसात करा तेच खऱ्या अर्थाने जिवन प्रवासात / कार्य करणाऱ्या प्रवासात एक योध्दा बनुन आपल्या मागे उभे राहतात. त्याची प्रचीती निर्माण होवुन स्वतःला दिसते. खोटे बोलणे म्हणजेच जाणीव पुर्वक केलेली फसवनुकच होय. ती कोणत्याही स्वरूपाची का असेना? ई पी एस 95 प पेंशन लवकरच वाढ होत आहे अशा आशयाचे भावनिक पोस्ट U ट्यूब चॅनल / पत्रकार देत असतात. त्या कृपया पुर्णतः रूपाने बंद करण्याचे अगत्याचे आहे असे नाही वाटत काय? त्यामुळे सरकारची प्रतिमा जगभरात मलीन होत असते याचा विचार करणे अगत्याचे आहे. पेंशन धारकांचा योग्य सन्मान करून येत्या दिवसात आयुष्याच्या संध्याकाळी पेंशन वाढीबाबत वेळीच दिलासा देवुन खोटे आश्वासने देणे भविष्यात टाळावे. आपण सत्याच्या मागे असल्याने दडलेल्या आनंद गुणाचा शोध घेणे सहज सोपे जाते. खोट्या च्या मागे असल्याने स्वतः (मग कोणतेही क्षेत्र का असेना) चे मुल्यांकन कमी होत असते. खोट्याच्या शेजारी उभ राहण्यापेक्षा सत्याच्या शेजारी उभ राहुन नक्कीच मोठ होता येते. हे विसरून चालणार नाही. ई पी एस 95 पेन्शन धारकांचे वाढीव पेन्शन वर्तमान महागाईचा विचार सरकारला करावेच लागेल हिच वर्तमानाची खरी गरज आहे. सरकारने *सकारात्मक विचार करून जेष्ठ पेंशन धारकांना लवकरच योग्य दिलासा मिळेल याकरीता सरकारी दूरदृष्टी आणि भावनांचा विचार करणे अत्यावष्यक आहे. या अपेक्षासह लेखाला मी पुर्ण विराम देतो.



**शब्दांकन:**
**विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,**
**लेखक/वृत्तपत्र समिक्षक**
**"स्नेहविजय"**
**24, उदयनगर, गल्ली नं. 4, नागपूर-440024**
**प्रबंधक (सामान्य/परिचालन) भा.खा.नि. जिल्हा कार्यालय, अजनी,नागपूर-15.**
**(सेवानिवृत्त ऑगस्ट 2016) उदय नगर, नागपूर**

# मुंबई महापालिका निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर

## महिलांसाठी ११४ जागा राखीव, अनेक दिग्गज नेत्यांना धक्का

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :** मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत आज जाहीर करण्यात आली. एकूण २२७ सदस्यसंख्येपैकी महिलांसाठी ११४ जागा राखीव ठेवण्यात आल्या असून, अनुसूचित जाती (एससी) साठी १५ प्रभाग, अनुसूचित जमाती (एसटी) साठी २ प्रभाग आणि नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) साठी ६१ प्रभाग आरक्षित करण्यात आले आहेत. सर्वसाधारण प्रभागांची संख्या १४९ असून, त्यापैकी ७४ जागा महिलांसाठी राखीव आहेत. या सोडतीमुळे विविध राजकीय पक्षांच्या अनेक दिग्गज नेत्यांना आणि माजी नगरसेवकांना जबरदस्त धक्का बसला असून, त्यांचे वार्ड महिलांसाठी किंवा ओबीसी महिलांसाठी आरक्षित झाल्याने ते निवडणुकीत अप्रत्यक्षपणे बाहेर पडण्याची शक्यता आहे.

राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या या आरक्षण सोडतीनुसार, मुंबईतील २२७ प्रभागांमध्ये आरक्षणाचा वाटा ठरवण्यात आला आहे. महिलांसाठी एकूण ११४ जागा (सर्वसाधारणमधील ७४, ओबीसीमधील ३०, एससी/एसटीमधील १०) राखीव ठेवण्यात आल्या आहेत. ओबीसीसाठी ६१ प्रभागांपैकी ३० महिलांसाठी, तर एससीसाठी १५ पैकी ७ आणि एसटीसाठी २ पैकी १ जागा महिलांसाठी आरक्षित आहेत. या सोडतीमुळे राजकीय पक्षांमध्ये खळबळ उडाली असून, अनेक नेत्यांना आपापल्या वार्डातून बाहेर पडावे लागण्याची वेळ आली आहे.

**ठाकरेंच्या सेनेला सर्वाधिक धक्का; माजी महापौर स्नेहल आंबेकर, सुरेश पाटील यांचे वार्ड महिलांसाठी**

ठाकरेंच्या शिवसेनेला या सोडतीचा सर्वाधिक फटका बसला आहे. गेल्या निवडणुकीत सक्रिय असलेल्या अनेक नेत्यांचे वार्ड महिलांसाठी आरक्षित झाले आहेत. वरळीतील ठाकरेंच्या गटाचे नेते आशिष चेंबुरकर यांचा वार्ड क्रमांक १९६ महिला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित करण्यात आला आहे. घाटकोपरचे विभागप्रमुख आणि ठाकरेंच्या सेनेचे प्रमुख चेहरा सुरेश पाटील यांचा वार्ड क्रमांक १२७ महिला सर्वसाधारण गटासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच, मुंबईच्या माजी महापौर आणि ठाकरेंच्या सेनेच्या प्रमुख नेत्यांपैकी एक स्नेहल आंबेकर यांचा वार्ड क्रमांक १९८ ओबीसी महिला वर्गासाठी आरक्षित झाला आहे. या नेत्यांनी गेल्या काळात पक्षाच्या मुंबईतील मजबुतीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती, पण आता त्यांना इतर वार्डातून उभे राहावे लागेल.

**शिंदे गट, राष्ट्रवादी आणि भाजप नेत्यांना अप्रत्यक्षपणे पराभव**

महायुतीतील शिंदे गटाला देखील धक्का बसला आहे. माजी स्थायी समितीचे सलग चार वर्षे अध्यक्ष राहिलेले आणि शिंदे गटाचे प्रमुख नेते यशवंत जाधव यांचा वार्ड क्रमांक २०९ महिला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित करण्यात आला आहे. भाजपच्या बाजूने माजी नगरसेवक मकरंद नार्वेकर यांचा वार्ड क्रमांक २२७ महिला वर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. तसेच, माजी विरोधी पक्षनेते रवी राजा यांचा वार्ड क्रमांक १७३ ओबीसी महिला वर्गासाठी आरक्षित झाला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाच्या मुंबई महिला अध्यक्षा राखी जाधव यांना देखील धक्का बसला असून, त्यांचा वार्ड क्रमांक १३१ महिला सर्वसाधारण गटासाठी आरक्षित करण्यात आला आहे. भाजप नेते किरीट सोमय्यांचे चिरंजीव नील सोमय्या यांचा वार्ड क्रमांक १०८ ओबीसी महिला वर्गासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. माजी नगरसेविका तेजस्विनी घोसाळकर यांचा वार्ड क्रमांक १ ओबीसी महिला वर्गासाठी आरक्षित झाला आहे.

**राजकीय विश्लेषकांचे मत : महिलांच्या आरक्षणामुळे निवडणुकीचे चित्र बदलणार**

राजकीय विश्लेषकांच्या मते, या आरक्षण सोडतीमुळे मुंबई महापालिका निवडणुकीचे चित्र पूर्णपणे बदलणार आहे. महिलांसाठी ५० टक्क्याहून अधिक जागा राखीव ठेवल्याने पक्षांना महिलांच्या उमेदवारांची शोध मोहीम राबवावी लागेल. "हे आरक्षण शेतकऱ्यांसारखे शहरी राजकारणातील मोठे बदल घडवणारे ठरणार आहे. दिग्गज नेत्यांना महिलांसाठी जागा सोडाव्या लागतील, ज्यामुळे नव्या चेहऱ्यांना संधी मिळेल," असे एका विश्लेषकाने सांगितले. निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, ही सोडत पारदर्शकपणे काढण्यात आली असून, याबाबत कोणत्याही तक्रारींसाठी वेळ मर्यादित आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया लवकरच सुरू होणार असून, या सोडतीमुळे राजकीय पक्षांत अंतर्गत गटबाजी आणि उमेदवारी वाटपावर तणाव वाढण्याची शक्यता आहे. शासनाच्या या निर्णयामुळे मुंबईतील राजकारणात महिलांचा वाटा वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

मुंबई महानगरपालिकेतील एकूण सदस्यसंख्या २२७

महिलांसाठी राखीव ११४

अनुसुचित जातींसाठी राखीव वॉर्ड- १५ महिला ८

अनुसुचित जमाती एकूण राखीव - २ महिला एक

ओबीसी राखीव ६१ महिला ३१

सर्वसाधारण वॉर्ड १४९ महिला राखीव ७४

---

## अल्पसंख्याक नेते माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पाटील यांचा जन्मदिन अभिष्टचिंतन

**दैनिक युवक आधार**

**खोपोली वार्ताहर :** रायगड जिल्ह्यातील अल्पसंख्याक नेते माजी उपनगराध्यक्ष इब्राहिम पाटील यांच्या ७० व्या जन्मदिन निमित्ताने नासिर पटेल सामाजिक शैक्षणिक सामाजिक विकास ट्रस्टच्या वतीने त्यांच्या उल्लेखनीय कार्यातील योगदान,शिकवण व प्रेरणादायी जीवनाच्या आठवणींना उजाळा देऊन संस्थापक अध्यक्ष नासिर महामुद्दमिया पटेल व मित्र परिवाराच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या .इब्राहिम भाईंच्या त्याग आणि अथक परिश्रम हे आमच्यासाठी नेहमीच आदर्श राहीले आहे ."त्यांच्या ७० वर्षांच्या जीवनप्रवासाने अनेक पिढ्यांना प्रेरणा मिळाली आहे आणि भविष्यातही मिळेल ." त्यांच्या भेटीने सदैव नवं चैतन्य व आत्मविश्वास वाढत असून त्यांच्या

मार्गदर्शक विचारांना कृतीतून घडविण्यासाठी सामजिक, राजकीय जीवनात नक्कीच प्रयत्न करू आणि पाटील कुटुंबियांच्या माध्यमातून होणारी लोकसेवा निस्वार्थी वृत्तीने पुढे हि चालवत राहू




अशी पाटील कुटुंबियांची कृतज्ञ भावना व्यक्त करत माजी नगरसेवक नासिर पटेल यांनी इब्राहिम भाई यांच्या निरोगी आयुष्यासाठी अल्लाहचरणी प्रार्थना करीत पुढील राजकीय वाटचालीसाठी त्यांच्या मार्गदर्शन रुपी विचारांच्या सदिच्छा स्वीकारल्या .यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ सचिव , साप्ताहिक सामान्य नागरिक संपादक साबीर शेख यांनी लोकमनातील आधारवड इब्राहिम भाई यांना कॉमन मॅन ते लोकनेतृत्व ,अजातशत्रू व्यक्तिमत्व अश्या गौरव उद्गाराने शुभेच्छा देत पद्मविभूषण आर. के .लक्ष्मण यांना समर्पित असलेले सामान्य नागरिक विचारांक वर्ष २०२५ भेट दिले.

---

## प्रा .सुभाष दिगंबर दगडे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या विश्वस्त पदी

**दैनिक युवक आधार**

**शिरूर कासार (प्रतिनिधी)**



येथील रहिवासी प्रा. सुभाष दिगंबर दगडे यांची नुकतीच मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विश्वस्त पदी बिनविरोध निवड करण्यात आली. ते या पदावर तीन वर्ष असणार आहेत. या निवडीबद्दल त्यांचे शिरूर तालुक्यात सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

शिरूर कासार शहरातील बांगडी व्यावसाईक ज्यांचे कौटोंबिक अर्थशास्त्र कोलमडलेल्या अवस्थेत होते, अशा दगडे कुटूंबातील सुभाष दगडे यांना शालेय जीवन वस्तिगृहात घालवले. जिद्द आणि चिकाटीच्या बळावर घरचे अर्थशास्त्र बदलून टाकायचे या विचाराने पछाडले. परिस्थितीचा विचार न करता शिक्षण क्षेत्रात झेप घेत थेट सांगली येथे मथुभाई गरवारे महाविद्यालयात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असतांना देखील अनेक उपक्रमात व्याख्यान देऊन प्रबोधन केले. ते सेवानिवृत्ती नंतर आजतागायत सामाजिक, शैक्षणीक क्षेत्रात मार्गदर्शन करत आहेत. अर्थशास्त्राचे गणित मांडत असल्याने नुकतीच मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४८ व्या अधिवेशनाच्या सर्वसाधारण बैठकीत प्रा. सुभाष दगडे यांची विश्वस्त पदी बिनविरोध तीन वर्षासाठी निवड करण्यात आली. या निवडीबद्दल दगडे यांचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

---

## बिइंग ह्युमन सामाजिक संस्थेच्या अनाथ आश्रमाकडुन सोनवणे परिवाराचा सन्मान

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी (रघुनाथ देवकर):**

असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान व तीर्थक्षेत्र असलेल्या "श्री विठ्ठल रुक्मिणीच्या" पंढरपूर नगरीपासून फक्त पंधरा किलोमीटरच्या अंतरावरती गादेगाव या ठिकाणी महाराष्ट्रातील पहिले रस्त्यावरील, बेघर, निराधार, बेवारस, मूकबधिर, अपंग,अनाथ आश्रमाचे कार्य एक मुस्लिम समाजातील सलीम सिकंदर आतार हे मोठ्या निष्ठेने तळमळीने अंतःकरणापासून व येईल त्या संकटावरती मात करून मोठ्या हिमतीने करीत आहेत. कोणत्याही रस्त्यावर ,आसपासच्या गावांमध्ये वरीलपैकी म्हणजे बेवारस ,मूकबधिर, निराधार, अपंग



अशा प्रकारच्या व्यक्ती आढळून आल्यास व माहिती मिळाल्यास रीतसर त्यांची वैद्यकीय ,शासकीय तपासणी करून त्यांना आपल्या आश्रमामध्ये सलीम भाई गेल्या अनेक वर्षापासून दाखल करून त्यांची सर्वतोपरी काळजी घेऊन पुण्याईचे काम करीत आलेले आहेत. अशाच त्यांच्या एका व्हिडिओ मधून माहिती मिळताच पिलीव येथील मूळ रहिवासी परंतु नोकरीनिमित्त मुंबई या ठिकाणी परिवहन विभागामध्ये वाहकाची सेवा करून सेवानिवृत्त झालेले श्री प्रकाश धोंडीबा सोनवणे यांनी त्यांच्या मित्रमंडळी सहित व कुटुंबासहित आषाढी एकादशीनंतर भेट देऊन तेथील आश्रमातील असणाऱ्या सर्व लाभार्थींना ब्लॅंकेट्स त्याचप्रमाणे स्नेहभोजन देऊन आश्रमाचे कौतुक केले. त्यानंतर सध्या झालेल्या कार्तिक वारीनंतर त्या सर्व बेवारसांना कपडे देऊन अल्पोपहार देऊन सेवा देण्याचे काम केले. त्यावेळी सदरचे संस्थाचालक सलीम भाई आतार व त्यांचे सहकारी यांनी श्री प्रकाश धोंडीबा सोनवणे व त्यांच्या सोबत असलेल्या श्री रघुनाथ देवकर, महादेव तावरे यांचाही सन्मान केला. व अतिशय भरल्या अंतःकरणाने श्री प्रकाश सोनवणे यांच्या या सेवेचा आदर करून ऋण व्यक्त केले. खरोखरच सदरच्या आश्रमाचे काम पाहता तेथे असलेल्या बेवारसांना आपल्या कुटुंबाची, नातेवाईकांची त्याचप्रमाणे स्नेही मंडळींची माया या आश्रमामधून मिळत असल्याचे सुद्धा या ठिकाणी दिसून आले. सदरच्या आश्रमाला वास्तविक अद्याप तरी कसलेही शासकीय अनुदान प्राप्त नसल्याचे समजले जे काही असे श्री प्रकाश सोनवणे यांचे सारखे दानशूर व्यक्ती मदत करत असतील अशा व्यक्तींवरच श्री सलीम भाई हे आपले मोलाचे कार्य करीत असल्याचे दिसून आले.

---

## युवक आधार बातमीचा इफेक्ट! तीन वर्षापासून खड्डे पडलेल्या सातारा पंढरपूर रस्त्याचे काम सुरू; बांधकाम खात्याची यंत्रणा सज्ज

**दैनिक युवक आधार**

**पिलीव प्रतिनिधी ( रघुनाथ देवकर):** सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील व सातारा पंढरपूर या मुख्य महामार्गावरील रस्त्याचे काम गेले अनेक वर्ष सुरू असून अनेक ठिकाणी खड्डे पडलेले होते.रस्ता अर्धवट होता साळमुख पिलीव या मध्यावर दोन्ही ओढ्यावर मोठमोठाले खड्डे पडून पावसाचे पाणी व ओघळ,ओढा, कॅनॉलचे पाणी त्यात मिसळून मोठ्या प्रमाणावर त्या ठिकाणी अडचणी निर्माण होत होत्या. सदरचा रस्ता हा मुख्य रस्ता असून या रस्त्यावरून सातारा पंढरपूर महामार्गावरच्या एस टी बसेस ,त्याचप्रमाणे लक्झरी गाड्या, शेतकऱ्यांच्या मालाच्या गाड्या यांची मोठ्या प्रमाणात रहदारी असून या मुख्य मार्गावरून सांगली सातारा व इतर ठिकाणाहूनही अनेक साधू, संत, महंतांच्या पालखी व दिंडी सोहळे आषाढी कार्तिकी माघ चैत्र या यात्रेच्या



युवक आधार

संपादक : श्री. संतोष शिवदास आमले

"पंढरपूर-सातारा मुख्य मार्गावरील" साळमुख-पिलीव"रस्त्यावरील खड्डे बुजवून रस्ता दुरुस्त न केल्यास नविलाजास्तव जनआंदोलन करण्याचा अखेरचा इशारा"

दैनिक युवक आधार

पिलीव प्रतिनिधी

पंढरपूर- सातारा या मार्गाला प्रति पालखी मार्ग असे संबोधले जाते. आणि त्याप्रमाणे आषाढी कार्तिकी व माघी वारीला सांगली, सातारा ,सोलापूर या जिल्ह्यातून व अनेक ठिकाणाहून पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी अनेक साधुसंतांच्या दिंड्या व पालखी सोहळे ये- जा करीत असतात. याशिवाय व्यापारी वर्ग त्यांचा असणारा आयात- निर्यातीचा माल, शेतकऱ्यांच्या शेतीचा माल उदाहरणार्थ मोठ्या प्रमाणात ऊसाची वाहतूक अशा अनेक उद्देशाने मोठ्या प्रमाणात रहदारी असते याशिवाय शालेय विद्यार्थ्यांच्या बसेस, मोठमोठ्या शहरांकडे जाणाऱ्या बसेस, याशिवाय दुचाकी स्वार, शिक्षणासाठी ये जा करीत असलेले विद्यार्थी विद्यार्थिनी, बाजारहाट करण्यासाठी जात-येत असलेले दुचाकीस्वार यांना या मार्गावरून प्रवास करीत असताना आपला जीव मुठीत धरून ये -जा करावी लागते. आणि हे काल-परवा आज असे नसून गेल्या चार वर्षापासून या रस्त्याची अशी अवस्था आहे खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा असा मोठा प्रमाणात जिकिरीचा प्रवास करावा लागत आहे. आठवड्यातून एक अपघात ठरलेलाच आहे, या अपूर्ण रस्त्यामुळे अनेकांचे जीव गेलेले आहेत वास्तविक याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना त्याचप्रमाणे मंत्रिमंडळ यांना सुद्धा ग्रामस्थांनी निवेदने दिलेली आहे. परंतु सदर रस्त्याचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून सर्वांच्याच विनंतीला केराची टोपली दाखवली गेलेली आहे. अनेक वर्तमानपत्राद्वारे सुद्धा याबाबत वाचा फोडण्याचा प्रयत्न केलेला आहे परंतु झोपी गेलेल्या ठेकेदाराला काडीचा सुद्धा फरक पडला नाही. या रस्त्यावरून प्रवास करताना दुचाकी स्वारालाच नव्हे, तर मोठ्या वाहनांना सुद्धा जीव मुठीत धरून मोठी कसरत करून प्रवास करावा लागत आहे. याविषयी असंख्य ग्रामस्थांच्या व वेगवेगळ्या संघटनांनी संताप व्यक्त केला असून आता जर याबाबत त्वरित लक्ष देऊन सदरचे खड्डे बुजून घेतले नाहीत किंवा रस्ता व्यवस्थित केला नाही, तर अखेरचे व अतिशय वेगळ्या पद्धतीने जनआंदोलन करण्याचा इशारा अनेक संघटना व ग्रामस्थांनी दिला असल्याचे समजते. त्यातून काही घडल्यास होणाऱ्या परिणामास संबंधित ठेकेदार व संबंधित खाते जबाबदार राहील असाही इशारा देण्यात आल्याचे समजते.

वेळी मोठ्या प्रमाणामध्ये या मार्गावरून पंढरपूरच्या श्री विठ्ठल रुक्मिणीच्या नगरीमध्ये ये जा करीत असतात. शिवाय अनेक शेतकरी ,शालेय विद्यार्थी व अनेक दुचाकीस्वार या मार्गावरून हे जात करीत असताना अक्षरशा जीव मुठीत धरून ये जा करावी लागत होती. या ठिकाणी अनेक मोठ्या प्रमाणात अपघात ही घडलेले आहेत.

ग्रामस्थांनी याबाबत लोकप्रतिनिधी, संबंधित अधिकारी यांना वेळोवेळी निवेदनं दिलेली आहेत. अनेक वर्तमानपत्रातूनही याबाबत आवाज उठवला गेलेला आहे परंतु सदरच्या कामाला गती मिळालेली नव्हती त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली होती. त्यातच "दैनिक युवक आधार"मध्ये बातमी प्रसिद्ध होताच या बातमीचा इफेक्ट होऊन यंत्रणा सज्ज होऊन कामास सुरुवात झालेली आहे त्यामुळे ग्रामस्थांमध्ये आनंदी आनंद होत असल्याची चर्चा ऐकायला मिळत आहे.

---

## एआय युगात जबाबदार पत्रकारितेसाठी नव्या मानसिकतेची गरज; कौशल्य विद्यापीठाच्या वतीने पत्रकारांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी :**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) च्या युगात पत्रकारितेला केवळ तांत्रिक कौशल्य नव्हे, तर जबाबदार वृत्तनिर्मितीची नवीन मानसिकता घडवावी लागेल, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा यांनी केले. एआयचा योग्य आणि नैतिक वापर करून लोकशाही संस्थांना बळकट करण्यासाठी माध्यमांची भूमिका अधिक प्रभावी व्हावी, यासाठी पत्रकारांनी हे तंत्रज्ञान आत्मसात करावे, असा त्यांनी सल्ला दिला.

रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वृत्तपत्र आणि डिजिटल माध्यम पत्रकारांसाठी एआय प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमती वर्मा बोलत होत्या. या कार्यक्रमात माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. अपूर्वा पालकर, संघाचे दिलीप सपाटे तसेच विविध वृत्तपत्रे, डिजिटल मीडिया आणि न्यूज एजन्सीजमधील पत्रकार उपस्थित होते. सूत्रसंचालन मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे सरचिटणीस दीपक भातुसे यांनी केले.

**एआय प्रशिक्षणाची रचना वैयक्तिक प्रावीण्यानुसार**




अपर मुख्य सचिव वर्मा म्हणाल्या, "एआय प्रशिक्षण हे सर्वांसाठी एकसारखे नसावे. प्रत्येक पत्रकाराचा अनुभव आणि तांत्रिक प्रावीण्य ओळखून याची रचना संरचित केली पाहिजे. केवळ साधनांची ओळख न देता, त्यांचा हॅंड्स-ऑन वापर शिकविणे ही खरी गरज आहे." या प्रशिक्षणात एआय इन न्यूज ब्रॉडकास्टिंग, एआय एथिक्स इन रिपोर्टिंग, नॅचरल लॅंग्वेज प्रोसेसिंग, फॅक्ट चेकिंग, ट्रान्सलेशन टूल्स, चॅट जीपीटी, ग्रामर्ली, गुगल ट्रान्सलेट यांसारख्या प्रायोगिक सत्रांचा समावेश आहे. "प्रशिक्षणाच्या प्रत्येक दिवशी शिकण्याचा आलेख चढता राहील आणि शेवटच्या दिवशी सहभागी अधिक आत्मविश्वासाने एआयचा वापर करू शकणार असतील," असे त्यांनी सांगितले.

श्रीमती वर्मा पुढे म्हणाल्या, "एआयवर हे प्रशिक्षण केवळ कोर्स म्हणून नव्हे, तर ज्ञानयुगाच्या नव्या दिशेने उचललेले पाऊल म्हणून घ्या. न्यूयॉर्क टाइम्स, गार्डियन, पीटीआय, हिंदुस्तान टाइम्स यांसारख्या आंतरराष्ट्रीय माध्यमांनी एआयचा अंगीकार केला आहे. महाराष्ट्रातील पत्रकारितेलाही हे नवे युग आत्मसात करावे लागेल. आपले उद्दिष्ट केवळ तांत्रिक प्रगती नसून, एथिकल जर्नालिझमच्या मूल्यांसह तंत्रज्ञानाचा जबाबदार वापर करणे हे असले पाहिजे."

**एआय म्हणजे 'आर्टिफिशियल ब्रेन'; मानवी हस्तक्षेप अपरिहार्य - कुलगुरू पालकर**

कार्यक्रमात बोलताना रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या, "कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'आर्टिफिशियल ब्रेन'. जसे मानवी मेंदूत मेमरी आणि प्रोसेसिंग या दोन प्रक्रिया चालतात, तसेच हे कृत्रिम मेंदूचे काम आहे. पण या आर्टिफिशियल ब्रेनचा उपयोग करताना मानवी बुद्धिमत्तेचा हस्तक्षेप कायम ठेवणे अत्यावश्यक आहे."

डॉ. पालकर पुढे म्हणाल्या, "आजच्या काळात एआयचा योग्य आणि जबाबदार वापर महत्त्वाचा आहे. चुकीचा वापर केल्यास चुकीची माहिती, फेक न्यूज आणि असत्यता पसरू शकते, हे आपण माध्यमांमध्ये पाहतो आहोत. त्यामुळे एआयच्या वापराबाबत कायदेशीर आणि नैतिक पैलूंचे ज्ञान असणे गरजेचे आहे. पत्रकारितेच्या दृष्टीने पुढील पाच वर्षांत मोठे बदल घडतील. त्यामुळे सर्व पत्रकारांनी एआय शिकणे अत्यावश्यक आहे."

कुलगुरू डॉ. पालकर यांनी सांगितले की, "एआय म्हणजे शेवटी डेटा आहे. जितका जास्त आणि शुद्ध डेटा आपण दिला, तितके चांगले आणि विश्वासार्ह परिणाम मिळणार आहेत. पत्रकारांनी फॅक्ट चेकिंग, ट्रान्सलेशन, कंटेंट प्रेझेंटेशन यांसारख्या बाबतीत एआय टूल्सचा अभ्यास करावा. आज इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये एआयच्या मदतीने व्हॉइसओव्हर, स्क्रिप्टिंग, व्हिडिओ तयार करणे अशा अनेक गोष्टी शक्य झाल्या आहेत. मात्र, एआय कितीही प्रगत झाले तरी मानवी संवेदनशीलता आणि विचारशक्ती अपरिहार्य आहे."

**पत्रकारितेला एआयचा पाठिंबा; फेक न्यूजविरोधी लढ्यात नवे हत्यार**

या प्रशिक्षणामुळे महाराष्ट्रातील पत्रकारांना एआय तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर शिकण्याची संधी मिळेल, ज्यामुळे वृत्तनिर्मिती अधिक जलद, अचूक आणि विश्वसनीय होईल. फेक न्यूज आणि चुकीच्या माहितीच्या वाढत्या प्रसाराच्या पार्श्वभूमीवर हे प्रशिक्षण पत्रकारितेला नवे संरक्षण कवच देणारे ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी पत्रकारांच्या वैयक्तिक गरजा लक्षात घेऊन सत्रांची रचना केली असून, सहभागींना प्रमाणपत्र देण्यात येईल.

महाराष्ट्र सरकारच्या या उपक्रमामुळे पत्रकारिता क्षेत्रात एआयचा प्रसार वाढेल आणि जबाबदार माध्यमांचा दर्जा उंचावेल, असा विश्वास व्यक्त होत आहे

---

## हॉकी स्टिकने इसमाला मारहाण

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर)**

फिर्यादी जुम्मन हनिफ खान यांना काही व्यक्तींनी हॉकी स्टिक व चाकूने मारहाण केल्याची घटना उसर्ली येथे घडली आहे. फिर्यादी जुम्मन हनिफ खान हे उसर्ली येथे त्यांच्या राहत्या घरी असताना ४ इसम त्यांच्या घरी आले व त्यांनी त्यांच्याशी भांडण काढुन त्यापैकी एकाने हॉकीस्टीक ने फिर्यादी यांच्या डोक्यात मारून व दुस-या एकाने त्याच्याकडे असन-या चाकुने फिर्यादी यांना डाव्या हाताला मारून दुखापत केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## खारघर मधील शाळा, मॉल पत्त्यावर बोगस मतदारांची नावे; 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना'चा आरोप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** खारघर मधील काही मतदाराची नावे खाजगी शाळा, रुग्णालय आणि मॉल या पत्त्यावर नोंदणी झाल्याचे दिसून येत असून, सदर सर्व मतदार बोगस मतदार असल्याचा आरोप 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना'चे खारघर मधील पदाधिकारी गणेश बनकर यांनी केला आहे.

> **खारघर मधील संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल या पत्त्यावर मतदारांची नावे असल्याचे मतदार यादीत दिसून येत आहे. तसेच एका टॉवर मध्ये मतदारांच्या नावासमोर चुकीचा घर क्रमांक नमूद करण्यात आले आहे. निवडणूक विभागाकडे तक्रार केली आहे. निवडणूक पूर्वी निवडणूक आयोगाने बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून वगळावीत अशी मागणी केली आहे.**
>
> **- गणेश बनकर, (पदाधिकारी मनसे, खारघर)**

खारघर परिसरातील काही मतदारांच्या नावासमोर फोटो नसल्याचे, घर अथवा सोसायटीचा पत्ता नसल्याचे तसेच एका सोसायटीच्या नावाखाली दुसऱ्या सोसायटी मधील मतदारांची नावे असल्याचे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या पडताळणीत समोर आले होते. दरम्यान, 'महाराष्ट्र नवनिर्माण सेना'चे पदाधिकारी गणेश बनकर यांनी केलेल्या पडताळणीत खारघर मधील संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्णालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर बोगस मतदारांची नावे नोंदविण्यात आल्याचे उघड झाले आहे. मतदार नोंदणी करताना शाळा आणि मॉल यांचे प्लॉट क्रमांक चुकीचे नमूद करण्यात आले आहेत. मतदार यादीत बोगस नावे टाकणाऱ्यांचे मोठे रकेट असून, निवडणूक आयोगाने वेळीच संजीवनी स्कूल, लिटिल वर्ल्ड मॉल, आरोग्य रुग्णालय आणि काही सोसायटींच्या पत्त्यावर नोंदविण्यात आलेली बोगस मतदारांची नावे मतदार यादीतून वगळावीत, अशी मागणी गणेश बनकर यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. दरम्यान, मतदार नोंदणी केंद्र असलेल्या संजीवनी स्कूल मध्ये विचारणा केली असता, 'काही मतदारांच्या नावासमोर स्कूलचा पत्ता नमूद केला असून, प्लॉट नंबर चुकीचा नमूद करण्यात आला आहे. तसेच कोणताही मतदार स्कूल मध्ये नाही', असे सांगण्यात आले.